“ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार”

- शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे

**Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur**

# Dattajirao Kadam Arts, Science and Commerce College,

# Ichalkaranji

# LIBRARY

## Newspaper Clippings

## 2023-24

तरुण भारत
शुक्रवार १५ सप्टेंबर २०२३

# डीकेएएससीमध्ये 'संविधान साक्षरता'वर व्याख्यान

**इचलकरंजी :** येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागाच्यावतीने संविधान साक्षरता या विषयावर अँड. माधुरी काजवे यांचे व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते. अँड. काजवे यांनी आपल्या व्याख्यानात, भारतीय संविधान हे फक्त राज्य पद्धतीच नाही तर ते एक आदर्श जीवन जगण्याची पद्धती आहे. प्रत्येक भारतीय नागरिकाला न्याय, स्वातंत्र व समता देणारे बंधुता निर्माण करणारे भारताचे संविधन आहे. भारतीय संविधान प्रत्येकाला माहित असायलाच पाहिजे पण त्याचबरोबर प्रत्येकाने ते आचरणात आणले पाहिजे. आज देशाला जरी स्वातंत्र मिळून ७५ वर्षे होवून गेली असली तरी याची माहिती अजूनही सर्व भारतीयांपर्यंत पोहचलेली नाही. पुढे त्यांनी आपल्या व्याख्यानात संविधनाचा इतिहास त्याची सुरुवात कशी झाली, जनहित याचिका, माहिती अधिकार या विषयावर बोलताना अनेक उदाहरणा मधून विद्यार्थांना मार्गदर्शन केले. स्वागत प्रेरणा जाधव, प्रमुख पाहुण्यांची ओळख आकांक्षा भांडे हिने केले. सुत्रसंचालन प्रेरणा जाधव व पायल खाडे यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. रुपाली सांभारे यांनी केले होते. समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. अर्जुन जाधव यांचे मार्गदर्शन आणि प्रोत्साहन लाभले. कार्यक्रमास पदवी व पदव्युत्तर विद्यार्थी, विद्यार्थिनी, राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. विशाल कांबळे, प्राध्यापक उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

महान कार्य
निज श्रावण कृ.३० उ. फाल्गुनी
दि. १५ सप्टेंबर २०२३

# डीकेएएससीमध्ये संविधान साक्षरता अभियान

इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा

येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागाच्यावतीने संविधान साक्षरता या विषयावर ॲड.माधुरी काजवे यांचे व्याख्यान संपन्न झाले. आपल्या व्याख्यानात, भारतीय संविधान हे फक्त राज्य पद्धतीच नाही तर ते एक आदर्श जीवन जगण्याची पद्धती आहे. प्रत्येक भारतीय नागरिकाला न्याय, स्वातंत्र व समता देणारे बंधुता निर्माण करणारे भारताचे संविधन आहे. व्याख्यानात संविधनाचा इतिहास त्याची सुरुवात कशी झाली, जनहित याचिका, माहिती अधिकार या विषयावर बोलताना अनेक उदाहरणा मधून विद्यार्थीना मार्गदर्शन केले. अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनिल पाटील होते. प्रास्ताविक व स्वागत प्रेरणा जाधव, सुत्रसंचालन प्रेरणा जाधव व पायल खाडे यांनी केले. आयोजन प्रा.डॉ.रुपाली सांभारे यांनी केले.कार्यक्रमासाठी समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ.अर्जुन जाधव यांचे मार्गदर्शन आणि प्रोत्साहन लाभले. कार्यक्रमासाठी पदवी व पदव्युत्तर विद्यार्थी, विद्यार्थिनी, राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.विशाल कांबळे, व महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

महान कार्य

भाद्रपद शु. ३ चित्रा
दि. १८ सप्टेंबर २०२३

# डीकेएएससीचे बुद्धिबळ स्पर्धेत यश

इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा

इचलकरंजी महानगरपालिका आयोजित शासकीय शालेय बुद्धिबळ स्पर्धा व्यंकटराव हायस्कूल या ठिकाणी संपन्न झाल्या. या झालेल्या स्पर्धेमध्येतून डी.के.ए.एस.सी. कॉलेजच्या आदित्य लोखंडे व प्रणव पवार या खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी खेळाडूंनी मिळवलेल्या या यशाबद्दल खेळाडूंचे अभिनंदन केले. या खेळाडूंना महाविद्यालयाचे फिजिकल डायरेक्टर प्रा.विनायक भोई, प्रा. मुजफ्फर लंगिवाले व प्रा.प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत मंगळवार १९ सप्टेंबर २०२३



इचलकरंजी : हिंदी भाषा सप्ताहाच्या उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. अनिल पाटील, हिंदी विभाग प्रमुख डॉ. अंजली उबाळे व मान्यवर.

# डीकेएएससीमध्ये हिंदी सप्ताहाचे उद्घाटन

**इचलकरंजी :** येथील दत्ताजीराव कदन आर्टस सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयातील हिंदी विभागाच्यावतीने हिंदी सप्ताहाच्या निमित्ताने वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन केले असून त्याचा उद्घाटन सोहळा पार पडला. हिंदी सप्ताहाचे उद्घाटन प्रश्नमंजुषा प्रतियोगितेने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. परीक्षक म्हणून हिंदी (कनिष्ठ विभाग) चे प्रा. रवी पाटील व प्रा. चावरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सामान्य ज्ञानावर आधारित या प्रश्नमंजुषेमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. प्रास्ताविक प्रा. डॉ. अंजली उबाळे यांनी केले आभार प्रा. अर्चना तराळ यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. किशोरी टोणपे, प्रा. अपर्णा कांबळे यांनी केले यावेळी प्रा. ऋतुजा भाटले, प्रा. संदीप हरगाणे उपस्थित होते

Scanned with CamScanner

तरुण भारत | मंगळवार १९ सप्टेंबर २०२३

# डीकेएएससी महाविद्यालयात भरडधान्य पाककला प्रदर्शन

## आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्षानिमित्त नाविन्यपूर्ण उपक्रम : भरड धान्याच्या माध्यमातून अनेक पौष्टीक पदार्थाची निर्मिती



**प्रतिनिधी**
इचलकरंजी

भरड धान्याच्या माध्यमातून अंगणवाडी पालकापासून ते महाविद्यालयीन विद्यार्थ्यांत आहारविषयक शिक्षणामध्ये आता पुन्हा एक नवीन जागृती निर्माण होण्यास प्रारंभ झाला आहे. अंगणवाडीत येणाऱ्या प्रत्येक पालकांना भरड धान्याचे महत्त्व सांगितले जात असतानाच आता आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्षानिमित्त महाविद्यालयीन युवकांमध्येही आता या आहाराविषयी जागरूकता निर्माण केली जात आहे.

श्री स्वामी विवेकानंद संस्थेचे दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज येथे वनस्पतीशास्त्र विभागांतर्गत विद्यार्थ्यांसाठी भरडधान्य पाककला प्रदर्शन घेण्यात आले. संयुक्त राष्ट्रांनी २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्ष म्हणून घोषित केला आहे.



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयामध्ये भरडधान्य पाककला प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी सौ. मोश्मी आवाडे, सौ. अस्मीता आमणे, प्राचार्य डॉ. अनिल पाटील व मान्यवर.

आपल्या देशात, आणि अन्न संस्कृतीत मात्र भरडधान्यांचा वापर नवा नाही. सुमारे सात हजार वर्षांपासून ही भरड धान्य आपल्या संस्कृतीचा भाग आहे असे सांगितले जाते. आरोग्यासाठी भरड धान्यांचे आहारातील महत्त्वही कळावे, या उद्देशाने वनस्पतीशास्त्र विभागामार्फत भरडधान्यापासून पाककला या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अन्नधान्याच्या रूपात आपण प्रामुख्याने गहू आणि तांदूळावर अवलंबून झालो आहोत. पण भारतात पूर्वी असे नव्हते. ऋतूनुसार भरड धान्यांचा भारतीय आहारात समावेश करण्यात आला. त्यामुळे पोट, पचन आणि आरोग्य सुरळीत होते.

कॉलेजातील प्रदर्शनात मुलांना भरडधान्याची ओळख व्हावी व त्यांचे महत्त्व समजावे म्हणून बाजरी, नाचणी, रागी, राळे, वरी यापासून पारंपरिक व आधुनिक काही पाककृती समजाव्यात यासाठी हे प्रदर्शन भरविण्यात आले होते. भरडधान्याच्या माध्यमातून आपल्याला कसे वेगवेगळे चविष्ट पदार्थ निर्माण करता येतात. त्याचबरोबर त्याची पौष्टिकता कायम कशी राहते हे विद्यार्थ्यांनी विविध पदार्थांच्या माध्यमातून सादर केले होते.

प्रमुख पाहुण्या सौ. मोश्मी आवाडे, सौ. अस्मीता आमणे, प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी मुलांचे कौतुक करत त्यांना भविष्यासाठी मार्गदर्शन केले व भरडधान्यचे महत्त्व त्यांच्या मनात रूजवले.

वनस्पतीशास्त्र विभागातील सहकाऱ्यांचे या कार्यक्रमासाठी मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांनी ७५ पाककृती करून आकर्षक सजावट करून ठेवल्या होत्या. संयोजक व विभागप्रमुख डॉ. सुभाष इंगळे यांनी नियोजन केले. सूत्रसंचालन डॉ. मधुमती शिंदे, आरती खोत यांनी केले. आभार डॉ. आम्रपाली कट्टी यांनी मानले.

Scanned with CamScanner

सकाळ कोल्हापूर, बुधवार, २० सप्टेंबर २०२३

# डीकेएएससी महाविद्यालयात भरडधान्य पाककला प्रदर्शन

▶ सकाळ वृत्तसेवा

इचलकरंजी, ता. १९ : डीकेएएससी महाविद्यालयात भरडधान्य पाककला प्रदर्शन झाले. आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्षानिमित्त वनस्पतीशास्त्र विभागातर्फे उपक्रम घेतला.

प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी भरडधान्याच्या माध्यमातून अनेक पौष्टिक पदार्थांची निर्मिती करत नानाविध भरडधान्यांचे महत्त्व जोपासले. प्रदर्शनातून महाविद्यालयीन तरुणांनी पौष्टिक आहाराविषयी जागरूकता निर्माण केली. विद्यार्थ्यांना भरड धान्याची ओळख व्हावी व त्यांचे महत्त्व समजावे, तसेच त्यापासून पारंपरिक व आधुनिक काही पाककृती समजाव्यात, यासाठी हे प्रदर्शन भरवले. प्रमुख पाहुण्या म्हणून मोशमी आवाडे, अस्मिता आमने यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी भरडधान्याचे महत्त्व सांगितले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते. सहभागी विद्यार्थ्यांनी ७५ पाककृती करून आकर्षक सजावट केली. बाजरी, नाचणी रागी, राळे, वरी आदींपासून विविध पाककृती तयार केल्या. पदार्थ तयार करून त्याची पौष्टिकताही विद्यार्थ्यांनी सादर केली. कार्यक्रमाचे संयोजन विभागप्रमुख डॉ. सुभाष इंगळे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. मधुमती शिंदे व प्रा. आरती खोत यांनी केले. आभार समन्वयक डॉ. आम्रपाली कट्टी यांनी मानले.



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात भरडधान्य पाककला प्रदर्शन भरवले.

CS Scanned with CamScanner

सकाळ
कोल्हापूर, बुधवार, २० सप्टेंबर २०२३



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात ॲड. माधुरी काजवे यांचे संविधान साक्षरता या विषयावर व्याख्यान झाले.

## डीकेएएससी महाविद्यालयात व्याख्यान

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात समाजशास्त्र विभागातर्फे संविधान साक्षरता या विषयावर व्याख्यान झाले. ॲड. माधुरी काजवे यांनी भारतीय संविधान हे फक्त राज्य पध्दती नाहीच तर एक आदर्श जीवन जगण्याची एक पध्दती आहे. पुढे व्याख्यानात त्यांनी संविधानाचा इतिहास, जनहित याचिका, माहिती अधिकार आदी विषयांवर मार्गदर्शन केले. स्वागत व प्रास्ताविक प्रेरणा जाधव यांनी केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख आकांक्षा भडि यांनी करुन दिली. सूत्रसंचालन पायल खाडे हिने केले. कार्यक्रमाचे आयोजन प्रा.डॉ.रूपाली सांबारे यांनी केले. यावेळी समाजशास्त्र विभाग डॉ.अर्जुन जाधव, राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.विशाल कांबळे आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ
कोल्हापूर, सोमवार, २५ सप्टेंबर २०२३




इचलकरंजी : गांधी चौकात पर्यावरणपूरक गणपती विसर्जनात डीकेएएससीचे राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक सहभागी झाले होते.

# मूर्ती विसर्जनात 'डीकेएएससी'चा सहभाग

इचलकरंजी : शहरातील पर्यावरणपूरक घरगुती गणपती विसर्जनात डीकेएएससी महाविद्यालयाने हातभार लावला. शहरातील विविध कृत्रिम कुंडांवर राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी सेवा दिली. स्वयंसेवकांकडून कुंडात मूर्ती विसर्जनासह निर्माल्य व प्लास्टिक गोळा करण्यात आले. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. अरुण कटकोळे यांसह स्वयंसेवक सहभागी झाले होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ कोल्हापूर, मंगळवार, २६ सप्टेंबर २०२३

# प्रा. भारती दोपारे यांना पीएच. डी.



भारती दोपारे

**इचलकरंजी :** येथील प्रा. भारती दोपारे यांना वनस्पतीशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवी प्राप्त झाली. कोल्हापूर जिल्ह्यातील ब्लॅकमेल्डू सूक्ष्मबुरशीचे शास्त्रीय वर्गीकरण या विषयामध्ये त्यांनी पीएच.डी. पदवी प्राप्त केली. या संशोधनातून त्यांनी जिल्ह्यातील अनेक सूक्ष्मबुरशीचे अस्तित्व सर्वांसमोर आणले आहेत. त्या दत्ताजीराव कदम आर्ट सायन्स अँड कॉमर्स कॉलेज येथे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. वनस्पतीशास्त्र संशोधक प्रो. सी. आर. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी पीएच.डी. मिळविली. त्यांना प्राचार्य डॉ. अनिल पाटील, वनस्पतीशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. एस. टी. इंगळे यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

सकाळ कोल्हापूर, गुरुवार, २८ सप्टेंबर २०२३




**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन सप्ताह उद्‌घाटनप्रसंगी प्रा. संदीप पाटील यांनी मार्गदर्शन केले.

# 'डीकेएएसी' राष्ट्रीय सेवा योजना दिन

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन सप्ताहाचे उद्‌घाटन केले. व्यक्तिविकासात राष्ट्रीय सेवा योजनेचे योगदान मोठे आहे. यातून श्रमप्रतिष्ठेचे मूल्य जपले जाऊन नेतृत्वगुणाचा विकास होतो, असे मत प्रमुख पाहुणे प्रा. संदीप पाटील यांनी व्यक्त केले. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे होते. राष्ट्रीय योजना सप्ताह, विद्यार्थी विकसनशील, तसेच समाजोपयोगी उपक्रम शहरात राबवले जाणार आहेत. उपप्राचार्य प्रा. डी. ए. यादव, डॉ. अनिल जांभळे, प्रा. विशाल गोडबोले, प्रा. विशाल कांबळे, प्रा. भारती कोळेकर, प्रा. किशोरी टोणपे, अपर्णा कांबळे, प्रवीण देशमुख आदी उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी अरुण कटकोळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. पी. के. वाघमारे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डी. जे. मुंगारे यांनी आभार मानले.

CS Scanned with CamScanner

सकाळ
कोल्हापूर, शनिवार, ३० सप्टेंबर २०२३



इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमधील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी शिवतीर्थ बस स्थानकात स्वच्छता मोहीम राबवली.

# 'डीकेएएससी'तर्फे बस स्थानकात स्वच्छता

इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमधील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी येथील शिवतीर्थ बस स्थानकाची स्वच्छता करत झळाळी आणली.

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ बस स्थानक अभियान व राष्ट्रीय सेवा योजना दिन सप्ताहांतर्गत स्वच्छता मोहिमेचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांनी प्रवाशांना पुन्हा एकदा 'एक कदम स्वच्छता की ओर' हा संदेश दिला. बस स्थानक परिसर स्वच्छ केला. स्वच्छतेसह प्लास्टिक संकलन केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. बस स्थानक स्वच्छ करून एक नवीन जाणीव निर्माण करून देत स्वच्छतेचे महत्त्व प्रवाशांना समजावून सांगितले. उपक्रमास प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांचे मार्गदर्शन मिळाले. आगार व्यवस्थापक सागर पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. अरुण कटकोळे, प्रा. प्रशांत कांबळे, रवी मेटे आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ सोमवार, २ ऑक्टोबर २०२३



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयाने जिल्हास्तरीय कुस्ती व जलतरण स्पर्धेत यश मिळवले.

# डीकेएएससी महाविद्यालयाचे यश

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयाने जिल्हास्तरीय कुस्ती व जलतरण स्पर्धेत यश मिळवले. शालेय शासकीय जलतरण स्पर्धा महानगरपालिकेच्या कै. शंकरराव पुजारी तलाव येथे झाल्या. विनायक कांबळे याने फ्रीस्टाइल २०० मीटर प्रकारामध्ये प्रथम व ४०० मीटरमध्ये द्वितीय क्रमांक प्राप्त केला. कुस्ती स्पर्धा व्यंकोबा मैदान येथे झाल्या. यामध्ये १९ वर्षांखालील फ्री स्टाईल स्पर्धेत श्रावणी सांगावेने ५० किलो वजनी गटात तर राज हजारे व ऋतुराज मगदूम यांनी अनुक्रमे ५७ व ७४ किलो वजनी गटामध्ये प्रथम क्रमांक मिळवला. तसेच १७ वर्षांखालील स्पर्धेत राजवर्धन जाधव ग्रिको कुस्ती प्रकारात ७१ किलो वजनी गटामध्ये प्रथम तर करण पवार याने फ्री स्टाईल कुस्ती प्रकारात प्रथम क्रमांक मिळवला. खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. यशाबद्दल प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी अभिनंदन केले. खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक प्रा. विनायक भोई, प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

महान कार्य
भाद्रपद कृ.३/४ भरणी
दि. ०२ ऑक्टोबर २०२३

# आपटे वाचन मंदिर येथे आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा संपन्न




इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा

शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी आपटे वाचन मंदिर इचलकरंजी येथे लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त आंतमहाविदयालयीन वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ.अलका शेलार-खोचरे व स्मिता कुलकर्णी यांनी काम पाहिले. लोकमान्य टिळकांच्या प्रतिमेचे पूजन दोनही परीक्षकांच्या हस्ते करण्यात आले. स्मिता कुलकर्णी यांचे स्वागत वाचनालयाच्या अध्यक्ष सुषमा दातार यांनी केले. डॉ. अलका शेलार-खोचरे यांचे स्वागत वाचनालयाचे सहकार्यवाह डॉ.कुबेर मगदूम यांनी केले. वाचनालयाच्या अध्यक्ष सुषमा दातार यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले. त्यांनी सध्याच्या काळात स्पर्धकांच्याकडून अपेक्षा तसेच या स्पर्धा किती महत्वाच्या आहेत याविषयी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचलन, प्रास्ताविक व आभार वाचनालयाच्या कार्यवाह कु.माया कुलकर्णी यांनी मानले. संस्थेचे पदाधिकारी, संचालक, विदयार्थी, पालक व मार्गदर्शक उपस्थित होते. पारितोषिक प्राप्त स्पर्धक - प्रथम क्रमांक कु.प्रज्ञा श्रीकांत माळकर (मथुबाई गरवारे कन्या महाविदयालय, सांगली), व्दितीय कु.आकांक्षा धर्मेंद भांडे (डिकेएससी कॉलेज, इचलकरंजी) तृतीय आर्यन राजाराम कांबळे (सहकारभूषण एस.के.पाटील महाविदयालय, कुरुंदवाड).

Scanned with CamScanner

सकाळ

कोल्हापूर, सोमवार, २ ऑक्टोबर २०२३




इचलकरंजी : आपटे वाचन मंदिरातील आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव केला.

## वक्तृत्व स्पर्धेत प्रज्ञा माळकर विजेती

इचलकरंजी : शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी आपटे वाचनमंदिर येथे लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा झाल्या. स्पर्धेत सांगलीची प्रज्ञा माळकर (मथुबाई गरवारे कन्या महावद्यालय) विजेती ठरली. द्वितीय आकांक्षा भांडे (दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी) तृतीय क्रमांक आर्यन कांबळे (सहकारभूषण एस. के. पाटील महाविद्यालय, कुरुंदवाड) यांनी मिळवला. परीक्षक म्हणून डॉ. अलका शेलार-खोचरे व स्मिता कुलकर्णी यांनी काम पाहिले. मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके दिली. वाचनालयाच्या अध्यक्षा सुषमा दातार व सहकार्यवाह डॉ. कुबेर मगदूम यांनी स्वागत केले. कार्यवाह माया कुलकर्णी यांनी आभार मानले.

Scanned with CamScanner

सकाळ कोल्हापूर, मंगळवार, ३ ऑक्टोबर २०२३

## जिल्हास्तरीय युवा महोत्सव : लोकनृत्यात दत्ताजीराव कदम कॉलेज प्रथम

# लोककलेत विवेकानंद कॉलेज अव्वल

▸ सकाळ वृत्तसेवा

मुरगूड, ता.२ : येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या ४३ व्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवामध्ये विद्यार्थी कलाकारांनी आपला कलाविष्कार सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली.

लोककलेमध्ये कोल्हापूरच्या विवेकानंद कॉलेजने, तर लोकनृत्य कलाप्रकारात इचलकरंजीच्या दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स,कॉमर्स कॉलेजने प्रथम क्रमांक पटकावला. येथील मंडलिक महाविद्यालयाच्या लोकनेते सदाशिवराव मंडलिक सांस्कृतिक मंचच्या भव्य सभागृहामध्ये झालेल्या या युवा महोत्सवात कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील ७६ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी १४ कला प्रकारामध्ये सहभाग नोंदवला.

महोत्सवातील विविध कलाप्रकारातील निकाल (अनुक्रमे) असा :

**लोककला** : विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, श्रीमती अक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी, देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर.

**लोकनृत्य** : दत्ताजीराव कदम आर्टस् सायन्स कॉमर्स कॉलेज इचलकरंजी, व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी, जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूर.

**मूकनाट्य** : भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर,देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर,यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय वारणानगर.

**नकला** : दत्ताजीराव कदम आर्टस् सायन्स कॉमर्स कॉलेज इचलकरंजी, भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर,डी.वाय.पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर.



मुरगूड : येथील मंडलिक महाविद्यालयाच्या प्रागंणात जिल्हास्तरीय युवा महोत्सवामध्ये लोककला सादर करताना महाविद्यालयीन युवती.

**मराठी वक्तृत्व** : न्यू कॉलेज कोल्हापूर, श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी, डी.वाय. पाटील प्रतिष्ठान कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर.

**हिंदी वक्तृत्व** : न्यू कॉलेज कोल्हापूर, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, दूध साखर महाविद्यालय बिद्री.

**इंग्रजी वक्तृत्व**: शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, के.आय.टी.कॉलेज कोल्हापूर, जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूर.

**वादविवाद** : दूध साखर महाविद्यालय बिद्री, न्यू कॉलेज कोल्हापूर, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर.

**सुगम गायन** : सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, न्यू कॉलेज कोल्हापूर.

**लोकसंगीत वाद्यवृंद** : विवेकानंद कॉलेज, न्यू कॉलेज कोल्हापूर, व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी.

**लघुनाटिका** : विवेकानंद कॉलेज, न्यू कॉलेज, रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स.

**एकांकिका** : रत्नापाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, विवेकानंद कॉलेज, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ

**समूहगीत** : विवेकानंद कॉलेज, राजाराम कॉलेज कोल्हापूर, रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स.

**पथनाट्य** : विवेकानंद कॉलेज, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय हल्कर्णी आणि दूधसाखर महाविद्यालय बिद्री.

Scanned with CamScanner

पुढारी मंगळवार, ३ ऑक्टोबर २०२३

# लोककलेत विवेकानंद, लोकनृत्यात कदम कॉलेज प्रथम

## मुरगूड येथे शिवाजी विद्यापीठाचा युवा महोत्सव

**मुरगूड : पुढारी वृत्तसेवा**

येथील मंडलिक महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने आयोजित ४३ व्या कोल्हापूर जिल्हास्तरीय युवा महोत्सवात लोककला स्पर्धेत कोल्हापूरच्या विवेकानंद कॉलेजने प्रथम क्रमांक मिळविला तर लोकनृत्य प्रकारात इचलकरंजीच्या दत्ताजीराव कदम महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकाविला.

जिल्हा युवा महोत्सवात एकूण १५ कला प्रकारच्या स्पर्धांचा समावेश होता. त्याचा निकाल असा - लोककलेत दुसरा क्रमांक श्रीमती आक्काताई पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी, तृतीय क्रमांक - देशभक्त रत्नापाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर, लोकनृत्यात दुसरा व तिसरा क्रमांक अनुक्रमे व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी व जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूर.

**मूक नाट्य** - प्रथम भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, द्वितीय कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, तृतीय यशवंतराव चव्हाण महाविद्यालय वारणानगर. नकला स्पर्धेत - प्रथम डी. के. कॉलेज इचलकरंजी, द्वितीय भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, तृतीय डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग. मराठी वक्तृत्व प्रथम - न्यू कॉलेज कोल्हापूर, द्वितीय - श्रीमती आक्काताई पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी, तृतीय - डी. वाय. पाटील प्रतिष्ठान कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर. हिंदी वक्तृत्व प्रथम - न्यू कॉलेज कोल्हापूर, द्वितीय - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, तृतीय - दूधसाखर महाविद्यालय बिद्री. इंग्रजी वक्तृत्व प्रथम - शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, द्वितीय - केआयटी कॉलेज कोल्हापूर, तृतीय - जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूर. वादविवाद प्रथम - दूधसाखर महाविद्यालय बिद्री, द्वितीय न्यू कॉलेज कोल्हापूर, तृतीय - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर.

**सुगम गायन** - प्रथम - सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, द्वितीय - देशभक्त रत्नाप्पाणा कुंभार, तृतीय - न्यू कॉलेज कोल्हापूर. लोकसंगीत वाद्यवृंद प्रथम - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, द्वितीय - न्यू कॉलेज कोल्हापूर, तृतीय - व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी. लघुनाटिका स्पर्धा प्रथम - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, द्वितीय - न्यू कॉलेज कोल्हापूर, तृतीय - कॉमर्स कॉलेज कोल्हापूर. एकांकिका प्रथम - देशभक्त रत्नापाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, द्वितीय - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, तृतीय - सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर. समूहगीत प्रथम - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, द्वितीय - राजाराम कॉलेज कोल्हापूर, तृतीय - देशभक्त रत्नापाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर. पथनाट्य प्रथम - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, द्वितीय - यशवंतराव चव्हाण महाविद्यालय हलकर्णी, तृतीय - दूधसाखर महाविद्यालय बिद्री. प्रश्नमंजुषा प्रथम - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, द्वितीय - राजाराम कॉलेज कोल्हापूर. या विजेत्या स्पर्धकांची दि. ११ ते १३ ऑक्टोबरपर्यंत दहीवडी कॉलेज (जि. सातारा) येथे होणाऱ्या मध्यवर्ती युवा महोत्सवासाठी निवड झाली आहे.



मुरगूड : युवा महोत्सवात कला सादर करताना युवक व युवती.

## १५ कला प्रकारांचे सादरीकरण

**मुरगूड : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग व सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मुरगूडमध्ये आयोजित जिल्हा युवा महोत्सवात १५ प्रकारच्या कलांचे बाराशे कलाकारांकडून सादरीकरण झाले.

कोल्हापूर जिल्हास्तरीय युवा महोत्सव २०२३ -२४ सालाचा ४३ वा जिल्हा युवा महोत्सव येथील मंडलिक महाविद्यालयाच्या प्रांगणात लोकनेते सदाशिवराव मंडलिक रंगमंचावर सोमवारी पहाटेपर्यंत झाला. या महोत्सवात जिल्ह्यातील ७६ महाविद्यालयांतील १२६० कलाकारांचा समावेश होता.

महोत्सव यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. अर्जुन कुंभार, उपप्राचार्य डॉ. टी. एम. पाटील, प्रा. डी. पी. साळुंखे, डॉ. शिवाजी होडगे, डॉ. उदय शिंदे, डॉ. अद्वैत जोशी आदींनी परिश्रम घेतले,

Scanned with CamScanner

दैनिक महासत्ता | मंगळवार, ता.३ ऑक्टोबर २०२३

# लोकनृत्यात इचलकरंजीचे डी.के.ए.एस.सी कॉलेज प्रथम

## मुरगूडमध्ये जिल्हास्तरीय युवा महोत्सव उत्साहात



मुरगूड ता.२(प्रतिनिधी)–

मुरगूड येथे सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्यावतीने आयोजीत ४३ व्या कोल्हापूर जिल्हास्तरीय युवा महोत्सवात लोककला स्पर्धेत कोल्हापूरच्या कॉलेजने प्रथम क्रमांक मिळविला तर लोकनृत्यप्रकारात इचलकरंजीच्या दत्ताजीराव कदम महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकाविला .

जिल्हा युवा महोत्सवात एकूण १५ कला प्रकारच्या स्पर्धाचा समावेश होता . त्याचा निकाल असा : लोककलेत दुसरा क्रमांक श्रीमती आक्काताई पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी. तृतीय क्रमांक देशभक्त रत्नापाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स , कोल्हापूर

लोकनृत्यात दुसरा व तिसरा क्रमांक अनुक्रमे व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी व जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूर .

**मूक नाटय** – प्रथम – भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, द्वितीय – कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, तृतीय – यशवंतराव चव्हाण महाविद्यालय वारणानगर .

**नकला स्पर्धेत**– प्रथम – डी. के . कॉलेज इचलकरंजी, द्वितीय– भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनियरिंग कोल्हापूर, तृतीय – डी.वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग .

**मराठी वक्तृत्व** – प्रथम– न्यू कॉलेज कोल्हापूर , द्वितीय – श्रीमती आक्काताई पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी, तृतीय– डी. वाय. पाटील प्रतिष्ठान कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर ,

**हिंदी वकृत्व** – प्रथम–न्यू.कॉलेज कोल्हापूर, द्वितीय – विवेकानंद कॉलेज कोल्हापूर , तृतीय– दुधसाखर महाविद्यालय बिद्री .

**इंग्रजी वक्तृत्व** – प्रथम – शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, द्वितीय – के आय टी कॉलेज कोल्हापूर , तृतीय – जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर .

**वादविवाद** – प्रथम – दुधसाखर महाविद्यालय बिद्री, द्वितीय – न्यू कॉलेज कोल्हापूर तृतीय – विवेकानंद कॉलेज कोल्हापूर .

**सुगम गायन**– प्रथम– सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर , द्वितीय – देशभक्त रत्नाप्पाणा कुंभार कॉलेज, तृतीय– न्यू कॉलेज ,कोल्हापूर.

**लोकसंगीत वाद्यवृंद**–प्रथम– विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, द्वितीय – न्यू कॉलेज कोल्हापूर , तृतीय – व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी .

**लघुनाटिका स्पर्धा** – प्रथम – विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, द्वितीय – न्यू कॉलेज कोल्हापूर, तृतीय – कॉमर्स कॉलेज, कोल्हापूर.

**एकांकिका** – प्रथम – देशभक्त रत्नापाणा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर , द्वितीय – विवेकानंद कॉलेज लोल्हापूर , तृतीय –सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर '

**समूहगीत** – प्रथम – विवेकानंद कॉलेज कोल्हापूर , द्वितीय – राजाराम कॉलेज कोल्हापूर , तृतीय– देशभक्त रत्नापाणा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर.

**पथनाटय प्रथम** – विवेकानंद कॉलेज कोल्हापूर , द्वितीय – यशवंतराव चव्हाण महाविद्यालय हलकर्णी , तृतीय –दूधसाखर महाविद्यालय बिद्री.

**प्रश्नमंजूषा** – प्रथम – विवेकानंद कॉलेज कोल्हापूर , द्वितीय – राजाराम कॉलेज कोल्हापूर.

या विजेत्या स्पर्धकांची दि .११ ते १३ ऑक्टोबर २०२३ रोजी दहीवडी कॉलेज जि. सातारा येथे होणाऱ्या मध्यवर्ती युवा महोत्सव साठी निवड झाली आहे.

Scanned with CamScanner

महान कार्य
भाद्रपद कृ. ५ कृत्तिका
दि. ०३ ऑक्टोबर २०२३

# डीकेएएससी., महानगरपालिकातर्फे स्वच्छता अभियान उपक्रम

इचलकरंजी /महान कार्य वृत्तसेवा

स्वच्छतेसंदर्भातील जागृकतेची रॅली महाविद्यालयातून काढण्यात आली.या रॅली मध्ये महाविद्यालयातील व डॉ.बापूजी साळुंखे हायस्कूल मधील एन.सी.सी.विभागांतील विद्यार्थी समाविष्ट होते. तसेच शाहू पुतळा येथे स्वच्छता विषयी शपथ घेवुन स्वच्छता मोहीमेस प्रारंभ करण्यात आला.श्री.मामा जाधव, विजय राजापूरे , विनोद जाधव यांचा देखील यामध्ये समावेश होता. स्वच्छते विषयीची शपथ प्रा. विनायक भोई यांनी अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांना दिली व स्वच्छता मोहिमेस प्रारंभ झाला. यावेळी एन.सी.सी. विभागातील विद्यार्थ्यांनी व महानगरपालिका कर्मचारी यांनी शाहु पुतळा परिसर व तिथून तीनबत्ती चौकापर्यंत रस्त्याच्या आजूबाजूला स्वच्छता केली. तसेच राजाराम ग्राउंडवर देखील स्वच्छता मोहिम राबविण्यात आली.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनखाली एन.सी.सी.विभाग प्रमुख प्रा.विनायक भोई यांनी या स्वच्छता अभियानाचे नियोजन केले.

CS Scanned with CamScanner

सकाळ कोल्हापूर, मंगळवार, ३ ऑक्टोबर २०२३

## डीकेएएससी महाविद्यालय

महाविद्यालयाच्या एनसीसी व एनएसएस विभागातर्फे स्वच्छता मोहीम राबवली. महाविद्यालय परिसरात स्वच्छता जागृकता रॅली काढली. शाहू पुतळा भागापर्यंत स्वच्छता करून स्वच्छतेची शपथ घेतली.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत संवाद
बुधवार, ४ ऑक्टोबर २०२३

# विवेकानंद कॉलेज ९ पदके मिळवून अव्वलस्थानी

## मुरगूड येथे ४३ वा जिल्हास्तरीय युवा महोत्सव : कॉलेज ऑफ कॉमर्सने ६ तर न्यू कॉलेजकडून ६ पदकांची लयलूट

वार्ताहर
मुरगूड

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभाग व येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयात आयोजित केलेल्या ४३ व्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवात विवेकानंद कॉलेज कोल्हापूरने तब्बल ९ पदके पटकावत महोत्सवात वर्चस्व मिळविले. तर देशभक्त रत्नाप्पा कुंमार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर यांनी ६ तर न्यू कॉलेज कोल्हापूरने ६ पदके पटकावली आहेत.

या महोत्सवातून विजयी झालेल्या संघाची ११ ते १३ नोव्हेंबर या कालावधीत सातारा जिल्ह्यातील दहिवडी कॉलेज येथे होणाऱ्या मध्यवर्ती युवा महोत्सवासाठी निवड झाली आहे. येथील युवा महोत्सवातून अनुक्रमे पहिल्या तीन विजयी झालेल्या महाविद्यालयांची नांवे अशी :

**लोककला :** विवेकानंद कॉलेज, (कोल्हापूर). श्रीमती अक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय, (इचलकरंजी), देशभक्त रत्नाप्पाकुंमार कॉलेज ऑफ कॉमर्स, (कोल्हापूर.)

**लोकनृत्य :** दत्ताजीराव कदम आर्ट्स सायन्स कॉमर्स कॉलेज (इचलकरंजी), व्यंकटेश महाविद्यालय (इचलकरंजी),जयसिंगपूर कॉलेज (जयसिंगपूर).

**मूकनाट्य :** भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजीनिरिंग(कोल्हापूर), देशभक्त रत्नाप्पा कुंमार कॉलेज ऑफ कॉमर्स (कोल्हापूर), यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय (वारणानगर).

**नकला :** दत्ताजीराव कदम आर्ट्स सायन्स कॉमर्स कॉलेज(इचलकरंजी), भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजीनिअरिंग (कोल्हापूर), डी.वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजीनिरिंग (कोल्हापूर).

**मराठी वक्तृत्व :** न्यू कॉलेज (कोल्हापूर), श्रीमती अक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय (इचलकरंजी), डी. वाय. पाटील प्रतिष्ठान कॉलेज ऑफ इंजीनिरिंग (कोल्हापूर).

**हिंदी वक्तृत्व :** न्यू कॉलेज, (कोल्हापूर), विवेकानंद कॉलेज,(कोल्हापूर), दुधसाखर महाविद्यालय, (बिद्री).

**इंग्रजी वक्तृत्व :** शहाजी लॉ कॉलेज, (कोल्हापूर), केआयटी कॉलेज,(कोल्हापूर), जयसिंगपूर कॉलेज (जयसिंगपूर).

**वादविवाद :** दुधसाखर महाविद्यालय(बिद्री), न्यू कॉलेज( कोल्हापूर), विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर).**सुगमगायन :** सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ (कोल्हापूर), देशभक्त रत्नाप्पा कुंमार कॉलेज ऑफ कॉमर्स (कोल्हापूर), न्यू कॉलेज (कोल्हापूर). **लोकसंगीत वाद्यवृंद :** विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर), न्यू कॉलेज (कोल्हापूर), व्यंकटेश महाविद्यालय (इचलकरंजी). **लघुनाटिका :** विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर), न्यू कॉलेज(कोल्हापूर), देशभक्त रत्नाप्पा कुंमार कॉलेज ऑफ कॉमर्स (कोल्हापूर).**एकांकिका :** देशभक्त रत्नाप्पा कुंमार कॉलेज ऑफ कॉमर्स (कोल्हापूर), विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर), सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ (कोल्हापूर). **समुहगीत :** विवेकानंद कॉलेज(कोल्हापूर), राजाराम कॉलेज (कोल्हापूर), देशभक्त रत्नाप्पा कुंमार कॉलेज ऑफ कॉमर्स (कोल्हापूर).**पथनाट्य :** विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर), यशवंतराव चव्हाण महाविद्यालय(हलकर्णी), दुधसाखर महाविद्यालय (बिद्री)**प्रश्नमंजुषा :** विवेकानंद पाटील (कोल्हापूर), राजाराम कॉलेज (कोल्हापूर).

युवा महोत्सव यशस्वी करण्यासाठी सदाशिवराव मंडलिक महाविद्यालया बरोबरच जयशिवराय एज्युकेशन सोसायटीच्या स्टाफने परिश्रम घेतले.



मुरगूड : येथील युवा महोत्सवात लोकसंगीत वाद्यवृंद सादर करताना विवेकानंद महाविद्यालयाचे विद्यार्थी.

Scanned with CamScanner

महान कार्य
भाद्रपद कृ. ६ रोहिणी
दि. ०४ ऑक्टोबर २०२३

# युवा महोत्सवात विवेकानंद कॉलेज, लोकनृत्यात दत्ताजीराव कदम महाविद्यालय प्रथम

मुरगूड /महान कार्य वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्यावतीने आयोजित ४३ व्या कोल्हापूर जिल्हास्तरीय युवा महोत्सवातील विविध कला प्रकारांच्या स्पर्धा येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयात मोठ्या उत्साहात पार पडल्या. या महोत्सवात एकूण १५ कला प्रकारच्या स्पर्धांच्या समावेश होता त्याचा निकाल पुढील प्रमाणे : लोककला-प्रथम क्रमांक कोल्हापूरच्या विवेकानंद कॉलेजने पटकाविला तर पटकाविला. दुसरा क्रमांक श्रीमती आक्काताई पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी, तृतीय क्रमांक- देशभक्त रत्नापाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर, लोकनृत्य - इचलकरंजीच्या दत्ताजीराव कदम महाविद्यालयाने प्रथम क्रमांक, व्दितीय क्रमांक व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी व तृतीय क्रम्मांक जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूर. मूक नाट्य प्रकारात - प्रथम क्रमांक भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, द्वितीय क्रमांक कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, तृतीय क्रमांक यशवंतराव चव्हाण महाविद्यालय वारणानगर.

CS Scanned with CamScanner

सकाळ कोल्हापूर, शुक्रवार, ६ ऑक्टोबर २०२३



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयाच्या योगा व ज्युदो स्पर्धेतील यशस्वी खेळाडूंचा सत्कार प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी केला.

## डीकेएएससी महाविद्यालयाचे यश

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयाने जिल्हास्तरीय योगा व ज्युदो स्पर्धेत यशस्वी कामगिरी केली. शालेय शासकीय ज्यूदो क्रीडा स्पर्धा नारायण मळा हायस्कूल येथे झाल्या. स्पर्धेत ऋतुराज मगदूम व श्रेयस हलके यांनी प्रथम क्रमांक मिळवला. योगा स्पर्धा जिम्नॅशियम हॉल येथे झाल्या. स्पर्धेत वैष्णवी शिंदे हिने रिदमिक खेळ प्रकारात द्वितीय, तर वैयक्तिक खेळ प्रकारात पाचवा क्रमांक मिळवला. खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. यशाबद्दल प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. शारीरिक शिक्षण संचालक प्रा. विनायक भोई, प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

सकाळ कोल्हापूर, सोमवार, ९ ऑक्टोबर २०२३



**इचलकरंजी :** डीकेएएससी कॉलेजमधील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे लेक वाचवा प्रबोधन रॅली काढण्यात आली.

# 'डीकेएएससी'तर्फे प्रबोधन रॅली

**इचलकरंजी :** डीकेएएससी कॉलेजमधील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे लेक वाचवा मोहीमेअंतर्गत प्रबोधन रॅली काढली. रॅलीचे उद्घाटन प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी केले. लेक वाचवा, देश वाचवा असा संदेश देत ही रॅली महाविद्यालय परिसरातून काढली. वाहनधारक, नागरिकांमध्ये प्रबोधन केले. कार्यक्रम अधिकारी प्रा. अरुण कटकोळे, प्रा प्रशांत कांबळे, प्रा. विनायक भोई, डॉ. अनिल जांभळे आदी सहभागी झाले.

CS Scanned with CamScanner

महान कार्य

भाद्रपद कृ.१० आश्लेषा

दि. ०९ ऑक्टोबर २०२३

# डीकेएएससी महाविद्यालयाची योगा व ज्युदो स्पर्धेत यशस्वी कामगिरी

इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा

शालेय शासकीय ज्यूदो क्रीडा स्पर्धा नारायण मळा हायस्कूल या ठिकाणी संपन्न झाल्या या स्पर्धेमध्ये डी के ए एस सी कॉलेजच्या ऋतुराज मगदूम व श्रेयस हलके या खेळाडूंनी प्रथम क्रमांक मिळवला व त्यांची विभागीय स्पर्धेसाठीं निवड झाली त्याचप्रमाणे योगा स्पर्धा जिम्नेशियम हॉल या ठिकाणी संपन्न झाल्या या स्पर्धेमध्ये महाविद्यालयाच्या वैष्णवी शिंदे या खेळाडूने रिदमिक खेळ प्रकारात द्वितीय तर वैयक्तिक खेळ प्रकारात पाचवा क्रमांक मिळवला तिची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. खेळाडूंनी मिळवलेल्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी अभिनंदन केले. महाविद्यालयाचे फिजिकल डायरेक्टर प्रा. विनायक भोई, प्रा.मुजफ्फर लगीवाले, प्रा. प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले महाविद्यालयातील प्राध्यापक स्टाफ प्रशासकीय स्टाफ व विद्यार्थी विद्यार्थिनींनी या खेळाडूंना पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

Scanned with CamScanner

सकाळ कोल्हापूर, मंगळवार, १० ऑक्टोबर २०२३

## 'डीकेएएससी'तर्फे वन्यजीव सप्ताह

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयात प्राणिशास्त्र विभागातर्फे वन्यजीव सप्ताह साजरा केला. या कालावधीत व्याख्याने, रांगोळी, पोस्टर मेकिंग, मॉडेल मेकिंग स्पर्धेचे आयोजन केले होते. वन भेटीचे आयोजन पावनखिंड (आंबा) येथे करण्यात आले. निसर्ग अभ्यासक प्रमोद माळी यांनी 'निसर्ग : एक विश्वकोश' या विषयावर मार्गदर्शन केले. वन्यजीवांचा अधिवास, निसर्गातील विविध वनस्पती व प्राणी यांचा अभ्यास प्रत्यक्ष अनुभूतीतून वनभेटीतून विद्यार्थ्यांनी घेतला. फुलपाखरू अभ्यासक डॉ. संतोष उमराणे यांनी मार्गदर्शन केले.

CS Scanned with CamScanner

सकाळ कोल्हापूर, बुधवार, ११ ऑक्टोबर २०२३



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात विविध स्पर्धांतील यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरित करण्यात आले.

## 'डीकेएएससी'मध्ये यशस्वितांचा गौरव

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात विविध स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ झाला. हिंदी विभागामार्फत हिंदी सप्ताहानिमित्त स्पर्धा घेतल्या. तुळजाभवानी महाविद्यालय तुळजापूरचे प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. काव्यवाचन, प्रश्नमंजूषा, निबंध कहानी आणि चित्रकला अशा विविध स्पर्धांमधील विजेत्या स्पर्धकांना पारितोषिक मान्यवरांच्या हस्ते देण्यात आली. महाविद्यालयीन जीवनामध्ये अभ्यासक्रमाबरोबरच इतर कलागुण, एखादा खेळ आपल्या अंगी असायला हवा. त्यामुळेच आपले जीवन समृद्ध होते, असे प्रतिपादन प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. मणेर यांनी केले. विविध कविता आणि गझल त्यांनी विद्यार्थ्यांना ऐकवल्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते. उपप्राचार्य डी. ए. यादव, प्रा.संजय सुतार उपस्थित होते. प्रास्ताविक हिंदी विभागप्रमुख डॉ. अंजली उबाळे, तर पाहुण्यांचा परिचय प्रा. अर्चना तराळ यांनी करून दिला. आकांक्षा भांडे हिने आभार मानले. किशोरी टोणपे आणि अपर्णा कांबळे यांनी सूत्रसंचालन केले.

CS Scanned with CamScanner

सकाळ कोल्हापूर, शुक्रवार, १३ ऑक्टोबर २०२३



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयाने जिल्हास्तरीय शालेय शासकीय मैदानी स्पर्धेत यश मिळवले.

# डीकेएएससी महाविद्यालयाचे यश

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयाने जिल्हास्तरीय शालेय शासकीय मैदानी स्पर्धेत यश मिळवले. सोळा खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी केल्याने त्यांची सांगली येथील विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. सौरभ दंडवते, साहिल कोळी, आकाश जमदाडे, समर्थ सासणे, दिव्याणी लायकर, समृध्दी माळी, पुष्कर माळी, सृष्टी कगुडे, रोहित नलवडे, सूरज साळुंखे, श्रेयस हलके, आदित्य झेले, ऋतुराज गोंदकर यांसह १०० व ४०० मीटर रिलेमध्ये संघाने विजेतेपद मिळवले. खेळाडूंचा प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते सत्कार झाला. जिमखानाप्रमुख प्रा. विनायक भोई, प्रा. मुझफ्फर लगीवाले, प्रा. प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

महान कार्य

भाद्रपद कृ. १४ उत्तरा फाल्गुनी
दि. १३ ऑक्टोबर २०२३

# 'नॅक' मूल्यांकनामध्ये विद्यार्थी, पालक, महाविद्यालयाची शैक्षणिक प्रगती महत्त्वाची

इचलकरंजी /महान कार्य वृत्तसेवा

'नॅक'मूल्यांकनासाठी महाविद्यालयाती विद्यार्थी, माजी विद्यार्थी, पालक व गेली पाच वर्षांत महाविद्यालय राबविलेल्या योजना, शैक्षणिक प्रगती विद्याथ्या साठी देण्यात आलेल्या भौतिक सुविधा शिक्षकांनी सादर केलेले शोध निबंध, संशोधन अत्यंत महत्त्वाचे आहेअसे मत तुळजाभवानी महाविद्यालय, तुळजापूर चे प्राचार्य डॉ एस.एम.मणेर यांनी व्यक्त केले. दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयात येऊ घातलेल्या नॅक मुलांकनाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी महाविद्यालयात स्टाफला मार्गदर्शन केले. ते पुढे म्हणाले, महाविद्यालयातील प्रत्येक घटक व टिम वर्क महत्वाचे आहे या साठी योग्य नियोजन करून नॅक मूल्यांकनाला सामोरे गेला तर चांगले मूल्यांकन मिळू शकते. यावेळी त्यांचा तुळजाभवानी महाविद्यालय तुळजापूरला नॅक मूल्यांकन मध्ये ग्रेड प्राप्त केल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने विशेष सत्कार



करण्यात आला. तुळजापूर येथील महाविद्यालयातील नॅक सर्वेक्षणादरम्यानचे अनुभव सांगत प्राचार्य मणेर यांनी महाविद्यालयातील स्टाफला मार्गदर्शन केले.

प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी प्राचार्य मणेर यांचे अभिनंदन करुन त्यांच्या मार्गदर्शनाबद्दल त्यांचे आभार मानले. यावेळी महाविद्यालयाचे दुपार सत्र प्रमुख प्रा. डी. ए. यादव, सकाळ सत्र प्रमुख डॉ. डी.सी.कांबळे, नॅक समन्वयक डॉ. विनायक गाणबावले, प्रा. संजय सुतार यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक बंधू भगिनी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

लोकमत
epaper.lokmat.com
शुक्रवार, दि. १३ ऑक्टोबर २०२३



महापालिकेच्या वतीने आयोजित शासकीय शालेय मैदानी स्पर्धेत येथील डीकेएएससी महाविद्यालयाने यश संपादन केले.

# शासकीय शालेय मैदानी स्पर्धेत डीकेएएससी महाविद्यालयाचे यश

लोकमत न्यूज नेटवर्क

इचलकरंजी : महापालिकेच्या वतीने आयोजित शासकीय शालेय मैदानी स्पर्धेत येथील डीकेएएससी महाविद्यालयाने यश संपादन केले. १६ विद्यार्थ्यांनी प्रथम आणि द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. प्रा. डॉ. अनिल पाटील यांनी कौतुक केले.

स्पर्धेत सौरभ दंडवते, साहील कोळी, आकाश जमदाडे, समर्थ सासणे, दिव्यानी लायकर, समृद्धी माळी, पुष्कर माळी, सृष्टी कगुडे, रोहित नलवडे, सूरज साळुंखे, श्रेयश फलके, आदिती झेले, ऋतुराज गोंदकर यांनी यश मिळवले. विद्यार्थ्यांना जिमखानाप्रमुख विनायक भोई, मुझफ्फर लगीवाले, प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

लोकमत

epaper.lokmat.com
, शनिवार, दि. १४ ऑक्टोबर २०२३

साहित्याला मागणी वाढली आहे. त्रावळी - ७ ते १० रूपय नगर, सुपारा त ३०० रूपय ) , काळा माता - १ पला

# युवा महोत्सवात 'विवेकानंद'ची बाजी

## सांघिक स्पर्धा जनरल चॅम्पियनशिप जिंकली : विविध स्पर्धांचे निकाल जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या आणि दहीवडी महाविद्यालय, दहीवडी यांच्या संयुक्त विद्यमाने दहीवडी (जि. सातारा) येथे आयोजित केलेल्या ४३ व्या युवा महोत्सवामध्ये प्रथम कुलगुरू दिवंगत डॉ. आप्पासाहेब पवार वैयक्तिक स्पर्धा जनरल चॅम्पियनशिप फिरता चषक फलटणच्या मुधोजी महाविद्यालयाने मिळविला. तर अभिजितदादा कदम सांघिक स्पर्धा जनरल चॅम्पियनशिप फिरता चषक कोल्हापूरच्या विवेकानंद महाविद्यालयाने पटकाविला.

विविध कला प्रकारांतील विजेत्यांची शुक्रवारी घोषणा करण्यात आली. शिवाजी विद्यापीठ आयोजित युवा महोत्सव अत्यंत उत्साहात पार पडला. एकापेक्षा एक बहारदार सादरीकरण झाले. विविध स्पर्धांमधील विजेते पुढीलप्रमाणे : सरदार बाबासाहेब माने लोककला फिरता चषक - दहीवडी कॉलेज दहीवडी, सरदार दादासाहेब माने लोकनृत्य फिरता चषक - किसनवीर महाविद्यालय, वाई. विलिंग्डन महाविद्यालय शताब्दी महोत्सवानिमित्त फिरता गौरव चषक नृत्य विभागात दहीवडी कॉलेज, किसनवीर, विवेकानंद महाविद्यालय यांना विभागून देण्यात आला; तर नाट्य आणि संगीत विभागात विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर, कला विभागात देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर तर वाङ्मय विभागात गव्हर्न्मेंट कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, कऱ्हाडने फिरता गौरव चषक मिळविला.

### वेगवेगळ्या कला प्रकारातील निकाल असा

■ **शास्त्रीय नृत्य :** विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूर (प्रथम), कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, कोल्हापूर (द्वितीय), दत्താजीराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, इचलकरंजी (तृतीय) **नकला** - गणपतराव आरवाडे कॉलेज ऑफ कॉमर्स, सांगली (प्रथम), दत्ताजीराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, इचलकरंजी (द्वितीय), विलिंग्डन कॉलेज, सांगली (तृतीय) ■ **एकपात्री अभिनय :** वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सांगली (प्रथम), दत्ताजीराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, इचलकरंजी (द्वितीय), विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (तृतीय) ■ **सुगम गायन :** आर्ट्स, कॉमर्स अँण्ड सायन्स कॉलेज, पलूस (प्रथम) लालबहादूर शास्त्री आर्ट्स, कॉमर्स अँण्ड सायन्स कॉलेज सातारा (द्वितीय), गव्हर्न्मेंट कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, कऱ्हाड (तृतीय) ■ **शास्त्रीय गायन :** मुधोजी कॉलेज फलटण (प्रथम) दत्ताजीराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय इचलकरंजी (द्वितीय), राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी साखराळे (तृतीय) ■ **पाश्चिमात्य एकल गायन :** विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (प्रथम), यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स सातारा (द्वितीय) देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर (तृतीय) ■ **शास्त्रीय सुरवाद्य :** मुधोजी कॉलेज फलटण (प्रथम ), देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर (द्वितीय), विवेकानंद कॉलेज कोल्हापूर (तृतीय).
■ **शास्त्रीय तालवाद्य :** सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (प्रथम), मुधोजी कॉलेज, फलटण (द्वितीय), महावीर महाविद्यालय, कोल्हापूर (तृतीय) ■ **पाश्चिमात्य एकलवादन :** वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग सांगली (प्रथम), विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (द्वितीय), सायबर कॉलेज, कोल्हापूर (तृतीय) ■ **स्थळचित्र :** विवेकानंद कॉलेज कोल्हापूर (प्रथम), विश्वासराव नाईक कला, वाणिज्य व बाबा नाईक विज्ञान महाविद्यालय शिराळा (द्वितीय) के. आय. टी. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोल्हापूर (तृतीय) ■ **व्यंगचित्र :** देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर (प्रथम), मुधोजी कॉलेज फलटण (द्वितीय), विवेकानंद कॉलेज कोल्हापूर (तृतीय).

Scanned with CamScanner

दै. सकाळ 16/10/2023

## → वाचन प्रेरणा दिन उत्साहात

**■ डीकेएएससी महाविद्यालय**

डॉ. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमापूजन उपप्राचार्य प्रा. डी. ए. यादव यांच्या हस्ते झाले. प्रा. रोहित शिंगे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. डॉ. अनिल जांभळे, ग्रंथालय लिपिक राणी साळुंखे, शिक्षकेतर कर्मचारी रमेश रावण, पी. डी. फडतरे उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

दक्षिण महाराष्ट्र
केसरी
१६ ऑक्टोबर २०२३/



इचलकरंजी : यशस्वी विद्यार्थ्यांसोबत प्रा. डॉ अनिल पाटील, मुजफ्फर लागीवले, विनायक भुई, प्रशांत कांबळे.

# कदम महाविद्यालयाचे महिला कबड्डी स्पर्धेत यश

**केसरी वृत्तसेवा**

इचलकरंजी : श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे दत्ताजीराव कदम आटर्स सायन्स, अँड कॉमर्स कॉलेज इचलकरंजीच्या कबड्डी महिला संघाने कुरुंदवाड येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर विभागीय कबड्डी स्पर्धेत चतुर्थ क्रमांक पटकावला. डी. के. ए. एस. सी. च्या कबड्डी संघाने शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे होणाऱ्या अंतरविभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. या संघामध्ये प्रांजल पोवार, साक्षी जाधव व साक्षी नेमिस्ते यांनी उत्कृष्ट आक्रमण केले तर निकिता चौगुले, साबिया नदाफ, पायल सावळे, प्रणिता सुतार, धनश्री पाटील, राजनंदिनी राऊत व सानिका नेमिस्ते यांनी उत्कृष्ट संरक्षण केले. खेळाडूंना प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांचे प्रोत्साहन लाभले, तर प्रा. मुजफ्फर लगीवाले, विनायक भुई व प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत
मंगळवार १७ ऑक्टोबर २०२३

# डीकेएएससीचा मध्यवर्ती युवा महोत्सवात झेंडा

प्रतिनिधी
इचलकरंजी

शिवाजी विद्यापीठाचा ४३ वा मध्यवर्ती युवा महोत्सव दहिवडी (ता. माण, जि. सातारा) येथे पार पडला. या युवा महोत्सवामध्ये दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयाने झेंडा उभा ठाकला आहे..

महाविद्यालयाचा सांस्कृतिक विभाग नेहमीच युवा महोत्सव व इतर विविध स्पर्धांमध्ये सातत्याने यश मिळवत असतो. हीच परंपरा कायम ठेवीत शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती युवा महोत्सवात महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी विविध कला प्रकारात यश मिळवले आणि महाविद्यालयाचा लौकिक कायम राखला. महाविद्यालयातील कलाकारांनी मध्यवर्ती युवा महोत्सवात पाश्चिमात्य समूहगीत - प्रथम, कातरकाम - प्रथम, लोकनृत्य - द्वितीय, लघुपट - द्वितीय, शास्त्रीय गायन - द्वितीय, नकला - द्वितीय, एकपात्री अभिनय - द्वितीय, शास्त्रीय नृत्य तृतीय क्रमांक अशा विविध कला प्रकारांमध्ये यश मिळवून सांस्कृतिक विभागाचा दबदबा कायम ठेवला आहे. संघाचे स्वागत प्राचार्य डॉ. अनिल पाटील, प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी वर्ग, विद्यार्थी, विद्यार्थिनीच्या उपस्थितीत जल्लोषात करण्यात आले. संघास संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अमयकुमार साळुंखे, संस्था सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. प्राचार्य डॉ. अनिल पाटील, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. डी. .सी. कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले. सांस्कृतिक विभागातील सदस्य डॉ. सुनिता वेल्हाळ, डॉ. पद्मश्री वाघमारे, डॉ. रीता रॉड्रिक्स, डॉ. सुभाष इंगळे, डॉ. अर्जुन जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.



इचलकरंजी : महाविद्यालयाच्या यशस्वी सांस्कृतिक संघासमवेत प्राचार्य डॉ. अनिल पाटील, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, प्राध्यापक, कलाकार विद्यार्थी.

Scanned with CamScanner

महान कार्य
आश्विन शु.३ विशाखा
दि. १७ ऑक्टोबर २०२३

# डी.के.ए.एस.सी.महाविद्यालयाचे महिला कबड्डी स्पर्धेत यश



इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे दत्ताजीराव कदम आटर्स सायन्स, अँड कॉमर्स कॉलेज इचलकरंजीच्या कबड्डी महिला संघाने कुरुंदवाड येथे संपन्न झालेल्या शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर विभागीय कबड्डी स्पर्धेत चतुर्थ क्रमांक पटकावला. या स्पर्धेत कोल्हापूर जिल्ह्यातील एकूण १७ महाविद्यालयाने सहभाग नोंदवला होता. डी. के. ए. एस. सी. च्या कबड्डी संघाने एकूण चार सामने जिंकत चतुर्थ क्रमांकावर शिक्का मोर्तब केला व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे होणाऱ्या अंतरविभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.

या संघामध्ये प्रांजल पोवार, साक्षी जाधव व साक्षी नेमिस्ते यांनी उत्कृष्ट आक्रमण केले तर निकिता चौगुले, साबिया नदाफ, पायल साबळे, प्रणिता सुतार, धनश्री पाटील, राजनंदिनी राऊत व सानिका नेमिस्ते यांनी उत्कृष्ट संरक्षण केले. वरील सर्व खेळाडूंना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांचे प्रोत्साहन लाभले तर महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. मुजफ्फर लगीवाले, ज्युनिअर जिमखाना विभाग प्रमुख विनायक भुई व प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

Scanned with CamScanner

महान कार्य
आश्विन शु.३ विशाखा
दि. १७ ऑक्टोबर २०२३

# डी.के.ए.एस.सी. महाविद्यालय सेपक टकरा स्पर्धेत विजयी

**इचलकरंजी /महान कार्य वृत्तसेवा**

इचलकरंजी महानगरपालिका आयोजित शासकीय शालेय सेपक टकरा स्पर्धा जयहिंद मंडळ येथे संपन्न झाल्या. या झालेल्या स्पर्धेमध्ये १९ वर्षाखालील वयोगटातील अंतिम सामना डी.के.ए.एस.सी. कॉलेज विरुद्ध बालाजी हायस्कूल व जुनिअर कॉलेज यांच्यामध्ये झाला. डी.के.ए.एस.सी महाविद्यालयाने या स्पर्धेत निर्विवाद वर्चस्व राखत या स्पर्धेचे विजेतेपद मिळवले. या संघामध्ये श्रेयस हलके, श्रेयस घाडगे, यश खांडेकर, मयुरेश पुजारी या महाविद्यालयातील खेळाडूंचा समावेश होता. विजयी संघाचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनिल पाटील यांनी अभिनंदन केले तर या संघाला जिमखाना प्रमुख प्रा. विनायक भोई, प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयातील प्राध्यापक स्टाफ, प्रशासकीय स्टाफ व विद्यार्थी विद्यार्थिनींनी संघाला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्याचप्रमाणे १४ वर्षाखालील गटामध्ये बालाजी हाय. व ज्यूनी. कॉलेज विजयी झाले तर १७ वर्षाखालील मुलींच्या गटामध्ये सौ. इंदुमती आवाडे मयूर हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज विजय ठरले.

CS Scanned with CamScanner

सकाळ
बुधवार, १८ ऑक्टोबर २०२३




**इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात नशामुक्त भारत अभियान उपक्रमाअंतर्गत डॉ. सचिन परब यांचे व्याख्यान झाले.**

# डॉ. सचिन परब यांचे व्याख्यान

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात नशामुक्त भारत अभियान. उपक्रमाअंतर्गत व्याख्यान झाले. प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाचे डॉ. सचिन परब (मुंबई) यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते. उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. विशाल गोडबोले, प्रा. वैशाली ढोबळे, डॉ. अनिल जांभळे आदी उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. अरुण कटकोळे यांनी केले. सूत्रसंचालन संजीवनी कदम हिने केले.

Scanned with CamScanner

सकाळ
, बुधवार, १८ ऑक्टोबर २०२३



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालय सेपक टकरा स्पर्धेत विजयी ठरले.

# डीकेएएससी महाविद्यालय विजेते

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालय सेपक टकरा स्पर्धेत विजयी ठरले. शासकीय शालेय सेपक टकरा स्पर्धा जयहिंद मंडळ येथे झाल्या. १९ वर्षाखालील वयोगटातील अंतिम सामन्यात निर्विवाद वर्चस्व राखत स्पर्धेत त्यांनी विजेतेपद मिळवले. संघामध्ये श्रेयस हलके, श्रेयस घाडगे, यश खांडेकर, मयुरेश पुजारी या खेळाडूंचा समावेश होता. विजयी संघाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी अभिनंदन केले. संघाला जिमखानाप्रमुख प्रा. विनायक भोई, प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

सकाळ

१९ ऑक्टोबर २०२३



इचलकरंजी : मध्यवर्ती युवा महोत्सवात डीकेएएससी महाविद्यालयाने यश मिळवले.

# युवा महोत्सवात 'डीकेएएसी'चे यश

इचलकरंजी, ता. १८ : डीकेएएससी महाविद्यालयाने मध्यवर्ती युवा महोत्सवात यश मिळवले. नऊ कलाप्रकारांमध्ये यश मिळवत महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाने परंपरा कायम ठेवत लौकिक कायम राखला. शिवाजी विद्यापीठाचा मध्यवर्ती युवा महोत्सव नुकताच दहिवडी (जि. सातारा) येथे झाला.

महाविद्यालयातील कलाकारांनी यंदा पाश्चिमात्य समूहगीत-प्रथम, कातरकाम - प्रथम, लोकनृत्य - द्वितीय, लघुपट - द्वितीय, शास्त्रीय गायन - द्वितीय, नकला - द्वितीय, एकपात्री अभिनय - द्वितीय, शास्त्रीय नृत्य प्रकारात तृतीय क्रमांक मिळवला. संघातील कलाकारांनी यशाचा जल्लोष साजरा केला.

संघास संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन मिळाले. सांस्कृतिक विभागातील कलाकारांना सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. डी. सी. कांबळे यांचे मार्गदर्शन मिळाले.

CS Scanned with CamScanner

लोकमत
epaper.lokmat.com
शुक्रवार, दि. २० ऑक्टोबर २०२३

# इचलकरंजीच्या एएससी महाविद्यालयाने मध्यवर्ती युवा महोत्सवात मिळविले यश

लोकमत न्यूज नेटवर्क

इचलकरंजी : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने दहिवडी (ता. माण) येथे झालेल्या मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये येथील दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयाने यश संपादन केले. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाने यावर्षीदेखील मध्यवर्ती युवा महोत्सवात आपले नैपुण्य दाखवून दिले. पाश्चिमात्य समूह गीत आणि कातर काम यामध्ये प्रथम क्रमांक, लोकनृत्य, लघुपट, शास्त्रीय गायन, नकला, एकपात्री अभिनय या प्रत्येक प्रकारात द्वितीय क्रमांक, तर शास्त्रीय नृत्यामध्ये तृतीय क्रमांक मिळविला आणि महाविद्यालयाचा दबदबा कायम ठेवला. या यशानंतर महाविद्यालयात जल्लोष केला.



दहिवडी येथील मध्यवर्ती युवा महोत्सवात यश संपादन केलेल्या एएससी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसह प्राचार्य अनिल पाटील, डी. सी. कांबळे, डी. ए. यादव, आदी उपस्थित होते.

यासाठी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. डी. सी. कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले. तर डॉ. सुनीता वेल्हाळ, पद्मश्री वाघमारे, रिटा रॉड्रिक्स, सुभाष इंगळे, अर्जुन जाधव यांचे सहकार्य लाभले.

CS Scanned with CamScanner

सकाळ
शुक्रवार, २० ऑक्टोबर २०२३



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयाने कबड्डी स्पर्धेत यश मिळवले.

# डीकेएएससी महाविद्यालयाचे यश

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयाने विभागीय महिला कबड्डी स्पर्धेत यश मिळवले. कुरुंदवाड येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ विभागीय कबड्डी स्पर्धेत चतुर्थ क्रमांक पटकावला. स्पर्धेत कोल्हापूर जिल्ह्यातील १७ महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला. महाविद्यालयाच्या कबड्डी संघाने चार सामने जिंकत चतुर्थ क्रमांकावर शिक्कामोर्तब केले. संघाची शिवाजी विद्यापीठात होणाऱ्या आंतरविभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. प्रांजल पोवार, साक्षी जाधव व साक्षी नेमिस्ते यांनी उत्कृष्ट आक्रमण केले. निकिता चौगुले, साविया नदाफ, पायल साबळे, प्रणिता सुतार, धनश्री पाटील, राजनंदिनी राऊत, सानिका नेमिस्ते यांनी उत्कृष्ट संरक्षण केले. खेळाडूंचा प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी सत्कार केला. शारीरिक शिक्षण संचालक प्रा. मुजफ्फर लगीवाले, ज्युनिअर जिमखाना विभाग प्रमुख प्रा. विनायक भोई, प्रा. प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

महान कार्य

आश्विन शु.७ पूर्वाषाढा
दि.२१ऑक्टोंबर २०२३

# मध्यवर्ती युवा महोत्सवात डीकेएएससी महाविद्यालयाचे यश



इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाचा ४३ वा मध्यवर्ती युवा महोत्सव नुकताच दहिवडी, ता.माण, जि.सातारा येथे पार पडला. या युवा महोत्सवामध्ये दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयाने भरघोस यश संपादन केले.

महाविद्यालयाचा सांस्कृतिक विभाग नेहमीच युवा महोत्सव व इतर विविध स्पर्धांमध्ये सातत्याने यश मिळवत असतो. हीच परंपरा कायम ठेवीत शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती युवा महोत्सवात महाविद्यालयातील विद्यार्थी–विद्यार्थिनींनी विविध कला प्रकारात मोठे यश मिळवले आणि महाविद्यालयाचा लौकिक कायम राखला. महाविद्यालयातील कलाकारांनी यंदाच्या मध्यवर्ती युवा महोत्सवात पाश्चिमात्य समूहगीत – प्रथम क्रमांक, कातरकाम – प्रथम क्रमांक, लोकनृत्य – द्वितीय क्रमांक, लघुपट – द्वितीय क्रमांक, शास्त्रीय गायन – द्वितीय क्रमांक, नकला – द्वितीय क्रमांक, एकपात्री अभिनय – द्वितीय क्रमांक, शास्त्रीय नृत्य तृतीय – क्रमांक अशा विविध कला प्रकारांमध्ये यश मिळवून महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाचा दबदबा कायम ठेवला आहे. या यशस्वी सांस्कृतिक संघाचे स्वागत महाविद्यालयात मा. प्राचार्य डॉ. अनिल पाटील तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्ग, प्रशासकीय कर्मचारी वर्ग आणि विद्यार्थी–विद्यार्थिनी यांच्या उपस्थितीत मोठ्या जल्लोषात करण्यात आले.

या सांस्कृतिक संघास संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सचिवा मा. प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. सांस्कृतिक विभागातील सर्व कलाकारांना मा.प्राचार्य डॉ.अनिल पाटील व सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.डी.सी.कांबळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच सांस्कृतिक विभागातील सदस्य डॉ.सुनिता वेल्हाळ, डॉ.पद्मश्री वाघमारे, डॉ.रीता रॉड्रिक्स, डॉ. सुभाष इंगळे व डॉ.अर्जुन जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

सकाळ
मंगळवार, २४ ऑक्टोबर २०२३



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात आयोजित व्याख्यानात कविता खोत यांनी मार्गदर्शन केले.

## 'डीकेएएससी'मध्ये ग्रंथ प्रदर्शन

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात ग्रंथालय विभाग, मराठी विभाग व वाङ्मय मंडळातर्फे व्याख्यान झाले. प्रमुख वक्त्या कविता खोत यांनी शिक्षणाने माणसाला शहाणपण येते. वाचनाने माणूस सुसंस्कृत, सौजन्यशील आणि व्यक्तिमत्त्वाने समृद्ध बनतो, असे मार्गदर्शन केले. ग्रंथ प्रदर्शन भरवले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते. पुस्तकप्रेमी विद्यार्थ्यांतर्फे कार्यक्रमाचे नियोजन केले. उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, ग्रंथपाल विजय यादव, प्रा. संजय सुतार, प्रा. रोहित शिंगे, डॉ. सुनीता वेल्हाळ आदी उपस्थित होते. प्रास्ताविक प्रियंका भाटले हिने केले. पाहुण्यांचा परिचय अनिशा कुरणे हिने केला. सूत्रसंचालन संजीवनी कदम हिने केले. आभार समृद्धी निकम हिने मानले.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत गुरूवार २६ ऑक्टोबर २०२३



इचलकरंजी : डीकेएएससीमध्ये वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमात बोलताना कविता खोत. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. अनिल पाटील, डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, मान्यवर.

# वाचनाने व्यक्तिमत्त्व समृद्ध बनते : कविता खोत

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

शिक्षणाने माणसाला शहाणपण येते, वाचनाने माणूस सुसंस्कृत, सौजन्यशील आणि व्यक्तिमत्वाने समृद्ध बनतो. म्हणून सर्वांनी सोशल मीडियाच्या आहारी न जाता पुस्तकांच्या पानांमध्ये रमलं पाहिजे. वाचाल तरच वाचाल, असे मत कविता खोत यांनी व्यक्त केले.

येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयात भारतरत्न डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम जयंती अर्थात वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते. महाविद्यालयाचा ग्रंथालय विभाग मराठी विभाग आणि वाङ्मय मंडळाच्या वियमाने वाचन प्रेरणा दिनाचे आयोजन केले होते. यावेळी ग्रंथ प्रदर्शन, सामूहिक ग्रंथ वाचन यांचेही आयोजन केले होते.

प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी प्रत्येकाने स्वत:चा ग्रंथसंग्रह वाढवला पाहिजे असे सांगितले. महाविद्यालयातील पुस्तक प्रेमी या विद्यार्थ्यांच्या ग्रुपने या समारंभाचे नियोजन केले होते. प्रास्ताविक प्रियंका भाटले हिने केले. पाहुण्यांचा परिचय अनिशा कुरणे हिने केले. आभार समृद्धी निकम हिने मानले. यावेळी गौरी लांयकर, प्रेम मद्दीहाळी, सरगम पोवार अभिषेक पुजारी या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, प्रा. विजय यादव, प्रा. संजय सुतार, डॉ. सुनीता वेल्हाळ, प्रा. अर्चना तराळ, प्रा. भारती कोळेकर, प्रा. रोहित शिंगे, प्राध्यापक, प्राध्यापिका, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते. सूत्रसंचालन संजीवनी कदम हिने केले.

CS Scanned with CamScanner

सकाळ , शुक्रवार, २७ ऑक्टोबर २०२३



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात स्टाफसाठी नॅक मूल्यांकन मार्गदर्शन प्राचार्य एस. एम. मणेर यांनी केले.

# डीकेएएससी महाविद्यालयात व्याख्यान

इचलकरंजी : नॅक मूल्यांकनासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी, माजी विद्यार्थी, पालक व पाच वर्षांत राबवलेल्या योजना, शैक्षणिक प्रगती विद्यार्थ्यांसाठी दिलेल्या भौतिक सुविधा आणि शिक्षकांनी सादर केलेले शोधनिबंध, संशोधन अत्यंत महत्त्वाचे आहे, असे तुळजाभवानी महाविद्यालय, तुळजापूरचे प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांनी सांगितले. डीकेएएससी महाविद्यालयात नॅक मूल्यांकनाच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालयीन स्टाफसाठी मार्गदर्शन व्याख्यानाचे आयोजन केले होते. यावेळी ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थनी प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते. उपप्राचार्य प्रा. डी. ए. यादव, डॉ. डी. सी. कांबळे, नॅक समन्वयक डॉ. विनायक गाणबावले, प्रा. संजय सुतार आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ कोल्हापूर, शनिवार, २८ ऑक्टोबर २०२३



**इचलकरंजी :** राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंचा गौरव करण्यात आला.

## 'डीकेएएससी'च्या खेळाडूंची निवड

इचलकरंजी : सांगली येथील क्रीडा संकुलामध्ये झालेल्या विभागीय मैदानी स्पर्धेमध्ये डीकेएएससी महाविद्यालयातील खेळाडूंनी यश संपादित केले. स्पर्धेमध्ये पुष्कर माळी याने थाळीफेकमध्ये प्रथम, सौरभ दंडवतेने हॅमर थ्रोमध्ये द्वितीय, दिव्यांनी लायकरने क्रॉस कंट्री स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवला. खेळाडूंची चंद्रपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली. खेळाडूंना प्राचार्य डॉ. अनिल पाटील, जिमखाना प्रमुख प्रा. विनायक भोई, प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

Scanned with CamScanner

महान कार्य
आश्विन कृ.१ भरणी
दि. २९ ऑक्टोबर २०२३

# डी.के.ए.एस.सी. खेळाडूंची राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेसाठी निवड

इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा

सांगली येथील क्रीडा संकुल मध्ये विभागीय मैदानी स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेमध्ये डी. के. ए. एस. सी. महाविद्यालयातील खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत यश संपादित केले.

या स्पर्धेमध्ये पुष्कर माळी याने थाळी फेक खेळप्रकारात प्रथम क्रमांक मिळवला,त्याचप्रमाणे सौरभ दंडवते या खेळाडूने हॅमर थ्रो मध्ये व्दितीय क्रमांक मिळवला तर दिव्यांनी लायकर या खेळाडूने क्रॉसकंट्री स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवला.या सर्व खेळाडूंची चंद्रपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली.



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनिल पाटील यांनी खेळाडूंनी मिळवलेल्या या यशाबद्दल अभिनंदन केले. जिमखाना प्रमुख प्रा.विनायक भोई, प्रा.मुजफ्फर लगीवाले, प्रा.प्रशांत कांबळे यांचे या खेळाडूंना मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयातील प्राध्यापक स्टाफ, प्रशासकिय स्टाफ व विद्यार्थी – विद्यार्थिनींनी पुढील कामगिरीसाठी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

CS Scanned with CamScanner

सकाळ र, गुरुवार, २ नोव्हेंबर २०२३



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात विद्यार्थी, प्राध्यापकांनी राष्ट्रीय एकतेची शपथ घेतली.

# 'डीकेएएससी'मध्ये राष्ट्रीय एकतेची शपथ

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात इंदिरा गांधी स्मृतिदिन व सरदार पटेल जयंती साजरी केली. प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी केले. विद्यार्थी, प्राध्यापकांनी राष्ट्रीय एकतेची शपथ घेतली. शपथेचे वाचन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. अरूण कटकोळे यांनी केले. डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. गोडबोले उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत । ६ नोव्हेंबर २०२३

# मैदानी खेळात राष्ट्रीय स्पर्धेसाठी पुष्कर माळी हिची निवड

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

चंद्रपूर येथे झालेल्या राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेत डी. के. ए. एस. सी. महाविद्यालयातील पुष्कर माळी (थाळी फेक), सौरभ दंडवते (हॅमर थ्रो), दिव्यांनी लायकर (क्रॉसकंट्री) या खेळाडूंचा सहभाग होता. या खेळाडूंनी आपले सर्वस्व पणाला लावून या स्पर्धेत खेळ केला.

या स्पर्धेत पुष्कर माळीने अद्वितीय खेळ करत थाळी फेक खेळात द्वितीय क्रमांक मिळवला व त्याची या कामगिरीमुळे नॅशनल स्पर्धेसाठी निवड झाली. तर सौरभ दंडवते ने देखिल हॅमर थ्रो खेळात उत्कृष्ट कामगिरी करत तृतीय क्रमांक मिळवला. त्याचप्रमाणे दिव्यांनी लायकर या खेळाडूने क्रॉसकंट्री खेळात चांगली कामगिरी केली.



चंद्रपूर : येथे झालेल्या राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेत डीकेएएससी महाविद्यालयातील यशस्वीतांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. अनिल पाटील व मार्गदर्शक शिक्षक.

खेळाडूंनी केलेल्या या अतुलनीय कामगिरीबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अमयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे यांनी खेळाडूंचे कौतुक करत अभिनंदन केले. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी खेळाडूंना या कामगिरीबद्दल शुभेच्छा दिल्या.

महाविद्यालयाचे फिजिकल डायरेक्टर प्रा. विनायक मोई, प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले. प्राध्यापक, प्रशासकीय स्टाफ, विद्यार्थी, विद्यार्थिनींनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

CS Scanned with CamScanner

महान कार्य
आश्विन कृ.९ आश्लेषा
दि. ०६ नोव्हेंबर २०२३

# डी.के.ए.एस.सी.च्या पुष्कर माळी ची नॅशनल स्पर्धेसाठी निवड



इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा

चंद्रपूर येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेत डी. के. ए.एस.सी. महाविद्यालयातील पुष्कर माळी (थाळी फेक), सौरभ दंडवते (हॅमर थ्रो), दिव्यांनी लायकर ( क्रॉसकंट्री) या खेळाडूंचा सहभाग होता. या खेळाडूंनी आपल सर्वस्व पणाला लावून या स्पर्धेत खेळ केला.या स्पर्धेत पुष्कर माळीने अद्वितीय खेळ करत थाळी फेक खेळात द्वितीय क्रमांक मिळवला व त्याची या कामगिरीमुळे नॅशनल स्पर्धेसाठी निवड झाली. तर सौरभ दंडवते ने देखिल हॅमर थ्रो खेळात उत्कृष्ट कामगिरी करत तृतीय क्रमांक मिळवला. त्याचप्रमाणे दिव्यांनी लायकर या खेळाडूने क्रॉसकंट्री खेळात चांगली कामगिरी केली. खेळाडूंनी केलेल्या या अतुलनीय कामगिरीबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे साहेब,सचिवा शुभांगी गावडे, संस्थेचे सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे यांनी खेळाडूंचे कौतुक करत अभिनंदन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनिल पाटील यांनी खेळाडूंना या कामगिरी बद्दल शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाचे फिजिकल डायरेक्टर प्रा.विनायक भोई, प्रा.मुजफ्फर लगीवाले, प्रा.प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयातील प्राध्यापक व प्रशासकीय स्टाफ ने तसेच विद्यार्थी विद्यार्थिनींनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

CS Scanned with CamScanner

सकाळ . मंगळवार, ७ नोव्हेंबर २०२३

# 'डीकेएएससी'च्या पुष्कर माळी याची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

इचलकरंजी, ता. ६ : डीकेएएससी महाविद्यालयाचा खेळाडू पुष्कर माळी याची राष्ट्रीय मैदानी स्पर्धेत निवड झाली आहे.

चंद्रपूर येथे झालेल्या राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेत माळी याने थाळी फेक प्रकारात, तर सौरभ दंडवते याने हॅमर थ्रो, दिव्यांनी लायकर हिने क्रॉसकंट्री खेळामध्ये सहभाग घेतला होता. स्पर्धेत पुष्कर माळीने उत्कृष्ट कामगिरी करत थाळी फेकमध्ये द्वितीय क्रमांक मिळवला. त्याची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. सौरभ याने हॅमर थ्रो खेळात तृतीय क्रमांक मिळवला आहे.

यशस्वी खेळाडूंचा प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते सत्कार केला. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. शारीरिक शिक्षण संचालक प्रा. विनायक भोई, प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

सकाळ ‌ , शुक्रवार, १० नोव्हेंबर २०२३



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयाची खेळाडू अक्षता शिकलगार हिचा प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी सत्कार केला.

## अक्षता शिकलगारला सत्कार

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयाची खेळाडू अक्षता शिकलगार हिने राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सुवर्ण कामगिरी केली. गोवा येथे झालेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राच्या रोलबॉल संघाने सुवर्णपदक पटकाविले. या विजेतेपदासाठी अक्षता शिकलगार हिने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. याबद्दल प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्याहस्ते तिचा सत्कार केला. तिला क्रीडा संचालक प्रा. विनायक भोई, प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. प्रशांत कांबळे आदींचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत । १० नोव्हेंबर २०२३

# नॅशनल गेम्समध्ये अक्षता शिकलगारला सुवर्ण

प्रतिनिधी
इचलकरंजी

गोवा येथे सुरू असलेल्या ३७ व्या नॅशनल गेम्समध्ये महाराष्ट्राच्या रोलबॉल संघाने सुवर्ण पदक प्राप्त केले. या संघामध्ये डीकेएएससी महाविद्यालयाच्या अक्षता शिकलगार नेत्रदीपक कामगिरी केली. स्पर्धेत तिने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात राजस्थान संघावर विजय मिळवत महाराष्ट्राने सुवर्ण पदकावर नाव कोरले. या झालेल्या अटीतटीच्या सामन्यात महाराष्ट्राने ४–३ अशा गुणाने राजस्थानवर मात केली.

या कामगिरीबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिवा शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे यांनी अभिनंदन केले. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी शुभेच्छा दिल्या.

तिला क्रीडा संचालक प्रा. विनायक भोई, प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले. अक्षता हिला प्राध्यापक, प्रशासकिय स्टाफ, विद्यार्थी, विद्यार्थिनींनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



इचलकरंजी : नॅशनल गेम्समध्ये अक्षता शिकलगारने सुवर्ण पदक पटकावल्याबद्दल सत्कार करताना प्राचार्य अनिल पाटील, मार्गदर्शक शिक्षक.

CS Scanned with CamScanner

महान कार्य
आश्विन कृ.१३ चित्रा
दि.११ नोव्हेंबर २०२३

# अक्षता शिकलगारची सुवर्ण कामगिरी



इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा

गोवा येथे सुरू असलेल्या ३७ व्या नॅशनल गेम्स मध्ये महाराष्ट्राच्या रोलबॉल संघाने सुवर्ण पदक प्राप्त केले. या संघामध्ये डी.के. ए. एस. सी महाविद्यालयाच्या अक्षता शिकलगार ने डोळ्याचे पारणे फेडणारी कामगिरी केली. संपूर्ण स्पर्धेत या खेळाडूने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले.

या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात राजस्थान संघावर विजय मिळवत महाराष्ट्राने सुवर्ण पदकावर नाव कोरले. या झालेल्या अटीतटीच्या सामन्यात महाराष्ट्राने ४-३ अशा गुणाने राजस्थान वर मात केली.

या कामगिरी बद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे साहेब, सचिवा शुभांगी गावडे मॅडम व संस्थेचे सी.ई.ओ. श्री.कौस्तुभ गावडे यांनी अभिनंदन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनिल पाटील यांनी शुभेच्छा दिल्या.

या खेळाडूला क्रीडा संचालक प्रा. विनायक भोई, प्रा. मुजप्फर लगीवाले, प्रा. प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

Scanned with CamScanner

तरुण भारत १४नोव्हेंबर

# रोटरीतर्फे डीकेएएससी महाविद्यालयास २०० बेंचेस प्रदान

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१७०, रोटरी क्लब ऑफ अतिग्रे, नारायणदास दामोदर भंडारी फाउंडेशन इचलकरंजी आणि टी. बी. लुल्ला चॅरिटेबल फाउंडेशन सांगली यांच्यावतीने दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालाला २०० बेंचेस प्रदान केले. हा सोहळा महाविद्यालयाच्या प्रांगणात पार पडला.

प्रांतपाल नासिर बोरसदवाला, आशिष भंडारी, यतीराज भंडारी डिस्ट्रिक्ट लिटरसी कमिटी चेअरमन डॉ. प्रशांत कांबळे यांच्या हस्ते व प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत महाविद्यालयास बेंचेस प्रदान करण्यात आले.



**इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयास बेंच प्रदान करताना रोटरी प्रांतपाल नासिर बोरसदवाला, आशिष भंडारी, यतीराज भंडारी, प्राचार्य डॉ. प्रशांत कांबळे, प्राचार्य डॉ. अनिल पाटील.**

प्रांतपाल बोरसदवाला यांनी महाविद्यालय आणि विद्यार्थ्यांना सदिच्छा दिल्या. रोटरी ही संस्था विद्यार्थी हितासाठी कार्य करत असते. आमच्या संस्थेकडून महाविद्यालयास सातत्याने सहकार्य असते आणि ते कायम राहील, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. प्रशांत कांबळे यांनी केले. रोटरीकडून सातत्याने विद्यार्थ्यांना आणि महाविद्यालयाला होणाऱ्या सहकार्याबद्दल प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी रोटरीचे आभार मानले. डॉ. डी. सी कांबळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा. डी. ए. यादव, रोटरी अतिग्रेचे सचिन चौगुले, रो. सचिन पाटील, प्रशांत गुरव, राजकुमार थोरवत, उदय दंडगे, प्राध्यापक, प्राध्यापिका, विद्यार्थी उपस्थित होते.

महान कार्य
कार्तिक शु.८ धनिष्ठा
दि. २० नोव्हेंबर २०२३

# 'डीकेएएससी'त माजी विद्यार्थी स्नेहमेळावा

इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा

डीकेएएससी महाविद्यालयातील कॉमर्स २००४-०५ बॅचचा माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा झाला. महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष सुनील पाटील, प्राचार्य डॉ. अनिल पाटील, प्रा. एम. एम. कांबळे, डॉ. डी. सी. कांबळे, यशवंत शितोळे, विद्यार्थी संघ पदाधिकारी रोहीत शिंगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

CS Scanned with CamScanner

सकाळ शुक्रवार, २४ नोव्हेंबर २०२३



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठाच्या आंतरविभागीय योगासन स्पर्धा झाल्या.

## डीकेएएससी महाविद्यालयामध्ये योगासन स्पर्धा

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठाच्या आंतरविभागीय योगासन स्पर्धा झाल्या. पुरुष व महिला गटासाठी सांगली, सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यांतील २१ महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला. स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयीन विकास समितीचे सदस्य सुनील पाटील, प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते झाले. क्रिकेट खेळाडू विनोद स्वामी, राहुल खामकर यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके दिली. विजेत्या खेळाडूंची चेन्नई येथे होणाऱ्या आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाली आहे. उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे, कार्यालय अधीक्षक एस. एस. महाडिक, डॉ. पी. ए. पाटील, डॉ. आर. एस. रॉड्रिक्स, पी. एम. कांबळे उपस्थित होते. प्रास्ताविक जिमखाना विभागप्रमुख प्रा. एम. डी. लगीवाले यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. रोहित शिंगे यांनी केले. आभार प्रा. विनायक भोई यांनी मानले. स्पर्धेचा निकाल अनुक्रमे : महिला गट- प्रज्ञा गायकवाड, सानिका जाधव, अक्षता भाईंगडे, वैष्णवी हजारे, सन्मती सगरे, ऐश्वर्या पाटील, पुरुष गट- ऋषीराज माने, चेतन महामुनी, समीर सणगर, अभिजित सावंत, ओंकार सकट, घननील लोंढे.

CS Scanned with CamScanner

महान कार्य
कार्तिक शु. १२ रेवती
दि. २४ नोव्हेंबर २०२३

# डी.के.ए.एस.सी. महाविद्यालयात आंतरविभागीय योगासन स्पर्धा



इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा

डी.के.ए.एस.सी. महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आंतरविभागीय योगासन पुरुष व महिला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेकरिता सांगली, सातारा, आणि कोल्हापूर जिल्ह्यांतील २१ महाविद्यालयाने सहभाग नोंदवला होता. तसेच संघ व्यवस्थापक मार्गदर्शक व पंच उपस्थित होते. स्पर्धे चे उद्घाटन सुनील (भाऊ) पाटील सदस्य, महाविद्यालय विकास समिती व प्राचार्य डॉ.अनिल पाटील यांच्या शुभहस्ते प्रतिमा पूजन करून करण्यात आले.

स्पर्धेच्या समारोपप्रसंगी महाविद्यालयाचे माजी क्रिकेट खेळाडू विनोद स्वामी व राहुल खामकर यांच्या हस्ते विजयी खेळाडूंना पारितोषिकं देण्यात आली.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत शनिवार २५ नोव्हेंबर २०२३



इचलकरंजी : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आंतरविभागीय योगासन स्पर्धेतील पुरुष व महिला गटातील विजय झालेल्या खेळाडूंसमवेत प्रमुख पाहुणे.

# डीकेएएससी महाविद्यालयात आंतरविभागीय योगासन स्पर्धांना प्रतिसाद

प्रतिनिधी
इचलकरंजी

डीकेएएससी महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आंतरविभागीय योगासन पुरुष व महिला भारतातील स्पर्धा पार पडल्या या स्पर्धेकरिता सांगली, सातारा, आणि कोल्हापूर जिल्ह्यातील २१ महाविद्यालयाने सहभाग नोंदवला होता.

स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालय विकास समिती सदस्य सुनील पाटील, प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून करण्यात आले. स्पर्धेच्या समारोपप्रसंगी महाविद्यालयाचे माजी क्रिकेट खेळाडू विनोद स्वामी व राहुल खामकर यांच्या हस्ते विजयी खेळाडूंना पारितोषिक-देण्यात आली.

स्पर्धेचा निकाल – महिला गट निकाल – प्रज्ञा गायकवाड, सानिका जाधव, अक्षता माईगडे, वैष्णवी हजारे, सन्मती सगरे, ऐश्वर्या पाटील. पुरुष गट – ऋषीराज माने, चेतन महामुनी, समीर सनगर, अभिजीत सावंत, ओंकार सकट, घननिळ लोंढे. स्पर्धेसाठी प्रमुख उपस्थिती सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. डी. सी. कांबळे, महाविद्यालयाचे कार्यालयीन अधीक्षक एस. एस. महाडिक, डॉ. पी. ए. पाटील, डॉ. आर. एस. रॉड्रिक्स, पी. एम. कांबळे उपस्थित होते. प्रास्ताविक जिमखाना विभाग प्रमुख प्रा. एम. डी. लगीवाले यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. रोहित शिंगे यांनी केले. आभार प्रा. विनायक भोई यांनी मानले.

Scanned with CamScanner

सकाळ
कोल्हापूर, गुरुवार, ३० नोव्हेंबर २०२३



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयाचा खेळाडू प्रथमेश खूळ याची राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

## प्रथमेश खूळ याची निवड

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयाचा खेळाडू प्रथमेश खूळ याची राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. सांगली क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे विभागीय बॉक्सिंग स्पर्धा झाल्या. यात त्याने प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व राखत विजेतेपदावर नाव कोरले. त्याने १९ वर्षांखालील स्पर्धेतील ४६ किलो वजन गटामध्ये प्रथम क्रमांक मिळवला. त्याचा प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी सत्कार केला. क्रीडा संचालक प्रा. भोई विनायक, प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

सकाळ ', शनिवार, २ डिसेंबर २०२३

# ए. एस. सी. कॉलेजतर्फे रॅली

▸ सकाळ वृत्तसेवा

इचलकरंजी, ता. १ : जागतिक एड्स निर्मूलन दिनानिमित्त ए. एस. सी. कॉलेज एनएसएस व एनसीसीतर्फे रॅली काढली. रॅली महाविद्यालय-आयजीएम हॉस्पिटल- शिवतीर्थ ते पुन्हा महाविद्यालय काढली. विद्यार्थ्यांनी घोषणा देत एड्स निर्मूलनाबाबत जनजागृती केली.

रॅलीत महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. अरुण कटकोळे, प्रा. विनायक भोई, प्रा. प्रशांत गायकवाड आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत शनिवार २ डिसेंबर २०२३



इचलकरंजी : राज्यस्तरीय स्पर्धेत निवड झालेल्या प्रथमेश खुळ याचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. अनिल पाटील व मार्गदर्शक शिक्षक.

# राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी डीकेएएससीच्या प्रथमेश खूळची निवड

**इचलकरंजी :** सांगली क्रीडा अधिकारी कार्यालय आयोजित विभागीय बॉक्सिंग स्पर्धा आपटा पोलीस चौकी येथे झाल्या. या विभागीय स्पर्धेत डीकेएएससी कॉलेजच्या प्रथमेश खूळ याने सर्व प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व राखत उत्कृष्ट खेळ करत विजेतेपदावर आपले नाव कोरले. त्याने १९ वर्षाखालील स्पर्धेतील ४६ किलो खालील वजन गटामध्ये प्रथम क्रमांक प्राप्त केला. याबद्दल प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी अभिनंदन केले. क्रीडा संचालक प्रा. भोई विनायक, प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले. प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनींनी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

CS Scanned with CamScanner

महान कार्य
कार्तिक कृ. ५, पुष्य
शनिवार, दि. २ डिसेंबर, २०२३

# शिवाजी विद्यापीठाच्या योगासन संघात डी. के. ए. एस. सी. खेळाडूंची निवड

इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे दत्ताजीराव कदम आर्टस्,सायन्स, अँड कॉमर्स कॉलेजच्या खेळाडूंची चेन्नई येथे होणाऱ्या साउथ वेस्ट झोन इंटर युनिव्हर्सिटी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली. डी. के. ए. एस. सी. महाविद्यालयात संपन्न झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय योगासन स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करून कु. समीर सनगर, कु. सानिका जाधव, कु. सन्मती सगरे, कु. ऐश्वर्या पाटील या खेळाडूंनी शिवाजी विद्यापीठ



संघात स्थान निश्चित केले. या खेळाडूंची अण्णा युनिव्हर्सिटी चेन्नई येथे दिनांक १ ते ४ डिसेंबर दरम्यान होणाऱ्या साऊथ वेस्ट झोन इंटर युनिव्हर्सिटी स्पर्धेसाठी निवड झाली.

या सर्व खेळाडूंना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांचे प्रोत्साहन लाभले. तर महाविद्यालयाचे जिमखाना विभाग प्रमुख प्रा. मुजफ्फर लगीवाले प्रा. विनायक भोई प्रा. प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

Scanned with CamScanner

सकाळ

# 'डीकेएएससी'मध्ये विभागीय बॉक्सिंग स्पर्धा

**सकाळ वृत्तसेवा**

इचलकरंजी, ता. ३ : डीकेएएससी महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठाच्या विभागीय बॉक्सिंग स्पर्धा झाल्या. उद्घाटन स्वामी विवेकानंद संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्याहस्ते झाले. यंदा डीकेएएससी महाविद्यालयाला स्पर्धेचे यजमानपद मिळाले.

प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर, प्राचार्य डॉ. अनिल पाटील, कन्या महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. त्रिशला कदम यांची प्रमुख उपस्थिती होती. दीपप्रज्वलन आणि प्रार्थनेने कार्यक्रमाला सुरुवात झाली. डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव आदी उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक प्रा. मुजफ्फर लगीवाले यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. रोहित शिंगे यांनी केले. आभार प्रा. विनायक भोई यांनी मानले.



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठाच्या विभागीय बॉक्सिंग स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्याहस्ते झाले.

**स्पर्धेचा अनुक्रमे निकाल असा** : पुरुष गट : ४६ ते ४८ किलो वजनी गट- अजित वालडी, ४८ ते ५१ किलो - संदेश काटकर, रेहान शेख, आर्य बुधले, ५१ ते ५४ किलो - राज पाटील, सुशांत कारंडे, शिवराज पाटील. ५४ ते ५७ किलो- अभिषेक पवार, ५७ ते ६० किलो - सौरभ संकपाळ, हिमेश राठोड, सिद्धार्थ गदाणे, ६० ते ६३.५ किलो - आदित्य जाधव, सारंग पाटील, चिन्मय पाटील, ६३.५ ते ६७ किलो - ओम हिरूर, युवराज कदम, स्नेहील गैडमनी, ६७ ते ७१ किलो- विश्वजीत पाटील, सुजल घाडगे, ७१ ते ७५ किलो - प्रथमेश गुरव, ७५ ते ८० किलो - आकाश धग, विशाल बर्ले, इंद्रजित पाटील, ८० ते ८६ किलो - प्रणव रोडे, ८६ ते ९२ किलो - रामानुज सिंग, ओंकार भोसले, ९२ पेक्षा अधिक किलो - सोमराज चौगुले, सूरज पाटील.

**महिला गट :** ४५ ते ४८ किलो - वैभवी दौलतकर, कृतिका शापूरकर, ऐश्वर्या चंदुरे, ४८ ते ५० किलो- सारिका शिंदे, ५० ते ५२ किलो - शुभांगी दुडे, ५४ ते ५७ किलो - श्रद्धा नलवडे, ऋतुजा देसाई, ५७ ते ६० किलो - माहेश्वरी बारटक्के, वैशणवी तेवरट्टी, श्रुती जाधव, ६६ ते ७० किलो - सानिका पाटील, भाग्यश्री दोदले, ७५ ते ८१ किलो - रुचा पाटील, ८१ पेक्षा अधिक किलो -अश्विनी इंगळे. विजेत्या खेळाडूंची इस्लामपूर येथे होणाऱ्या आंतर विभागीय विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

Kolhapur, Gadhinglaj-Today
04/12/2023 Page No. 4

केसरी ■ ४ डिसेंबर २०२३/८



इचलकरंजी : बॉक्सिंग स्पर्धेचे उद्घाटन करताना प्राचार्य अभयकुमार साळुंखे. यावेळी उपस्थित डॉ. एस. एम. मनेर.

# डीकेएएससीमध्ये विद्यापीठ विभागीय बॉक्सिंग स्पर्धा

केसरी वृत्तसेवा

इचलकरंजी : कोल्हापूर विभागीय बॉक्सिंग स्पर्धा शनिवार दि. २ डिसेंबर रोजी संपन्न झाल्या. या स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्याहस्ते झाले.

ते म्हणाले, कोल्हापूर जिल्ह्याला क्रीडा परंपरेचा समृद्ध वारसा छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी मिळवून दिला आहे. शाहू महाराज व शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचा हा वारसा जोपासत आजच्या विद्यार्थ्यांनी ज्ञान, विज्ञान, संस्काराबरोबरच एखादा खेळ किंवा कला जोपासायला हवी आणि स्वतःचे मन आणि मनगट सुदृढ बनवायला हवे यासाठी अशा स्पर्धांचे आयोजन महत्त्वाचे आहे.

प्राचार्य डॉ. एस. एम. मनेर म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी समर्पित भावाने केलेल्या शिक्षणप्रसार कार्यातील डीकेएएससी हे एक नामांकित महाविद्यालय आहे. या समारंभात महाविद्यालयातून नुकतेच बदललेले प्राचार्य डॉ. अनिल पाटील व नूतन प्राचार्य डॉ. मनेर या दोघांनाही संस्था कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी शुभेच्छा दिल्या.

CS Scanned with CamScanner

महान कार्य
कार्तिक कृ.७ मघा
दि. ०४ डिसेंबर २०२३

# 'डीकेएएससी'मध्ये विद्यापीठ विभागीय बॉक्सिंग स्पर्धा

इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचालित दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी आयोजित शिवाजी विद्यापीठाच्या कोल्हापूर विभागीय बॉक्सिंग स्पर्धा शनिवार दि. २ डिसेंबर रोजी संपन्न झाल्या. या स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे कार्याध्यक्ष मा.प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या शुभहस्ते झाले. महाविद्यालयाला प्रस्तुत विद्यापीठ स्पर्धेचे यजमानपद मिळाल्याबद्दल कौतुक करताना ते म्हणाले, कोल्हापूर जिल्ह्याला क्रीडा परंपरेचा समृद्ध वारसा छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी मिळवून दिला आहे. कला, क्रीडा, संस्कृती, शिक्षण, कृषी आणि उद्योग या क्षेत्रांचा पाया राजर्षी शाहूंनीच इथे घातला. शाहू महाराज व शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचा हा वारसा जोपासत आजच्या



विद्यार्थ्यांनी ज्ञान, विज्ञान, संस्काराबरोबरच एखादा खेळ किंवा कला जोपासायला हवी आणि स्वतःचे मन आणि मनगट सुदृढ बनवायला हवे यासाठी अशा स्पर्धांचे आयोजन महत्त्वाचे आहे.

समारंभात आपले मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाचे नूतन प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी समर्पित भावाने केलेल्या शिक्षणप्रसार कार्यातील डीकेएएससी हे एक नामांकित महाविद्यालय आहे. या महाविद्यालयात बदलीने रुजू होत असतानाच विद्यापीठाच्या विभागीय बॉक्सिंग

CamScanner

सकाळ



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात एनसीसी दिन मार्गदर्शन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे भूपाल कुंभार यांचे डॉ. डी. सी. कांबळे यांनी स्वागत केले.

# एनसीसीच्या शिस्तीने जीवनाला आकार : कुंभार

## डीकेएएससी महाविद्यालयात कार्यक्रम

इचलकरंजी, ता. ३ : महाविद्यालयीन जीवनात एनएनसीमुळे चांगली शिस्त लागते. पुढे हीच शिस्त जीवनाला आकार देते. शिस्तप्रिय जीवन जगत असताना येणारा अनुभव यशस्वी गोष्टी करण्यासाठी उपयुक्त ठरतो. विद्यार्थ्यांनी शिस्त व आदर बाळगल्यास पाहिलेले प्रत्येक ध्येय निश्चित पूर्ण होईल, असा विश्वास भारतीय सैन्य दलातील पॅराकमांडो व स्पेशल फोर्स निवृत्त जवान भूपाल कुंभार यांनी व्यक्त केला.

डीकेएएससी महाविद्यालयात एनसीसी दिन सप्ताहात आयोजित मार्गदर्शन कार्यक्रमात ते बोलत होते. श्री. कुंभार यांनी अनेक उदाहरणातून सैन्य दलातील प्रेरणादायी अनुभव विद्यार्थ्यांसमोर उलगडला. स्वतःच्या दिनचर्येत काम करताना मन, मनगट, मेंदू बळकट करण्यासाठी एनसीसी महत्त्वपूर्ण काम करते, असे मत उपप्राचार्य प्रा. डी. ए. यादव यांनी व्यक्त केले. उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे म्हणाले, 'एनसीसीमुळे व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. शिस्तीतून घडणाऱ्या विद्यार्थ्यांमुळे त्याचे घर गाव यांसह देश शिस्तबद्ध होण्यास मदत होते.' मुख्याध्यापक व्ही. आर. पाटील आदी उपस्थित होते. स्वागत, प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांची ओळख एनसीसी विभागप्रमुख प्रा. विनायक भोई यांनी करून दिली. सूत्रसंचालन प्रा. रोहित शिंगे यांनी केले. आभार व्ही. एस. मुलाणी यांनी मानले.

Kolhapur, Gadhinglaj-Today
04/12/2023 Page No. 4

सकाळ



इचलकरंजी : विद्यापीठ योगासन संघात निवड झाल्याबद्दल खेळाडूंचा प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते सत्कार झाला.

# 'डीकेएएससी'च्या खेळाडूंची निवड

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयाच्या खेळाडूंची शिवाजी विद्यापीठ योगासन संघात निवड झाली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या आंतरविभागीय योगासन स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करून समीर सणगर, सानिका जाधव, सन्मती सगरे, ऐश्वर्या पाटील यांनी विद्यापीठ संघात स्थान निश्चित केले. त्यांची चेन्नई येथे होणाऱ्या आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाली आहे. खेळाडूंचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्याहस्ते सत्कार झाला. जिमखाना विभाग प्रमुख प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. विनायक भोई, प्रा. प्रशांत कांबळे, डॉ. आर. एस. रॉड्रीक्स यांचे मार्गदर्शन लाभले.

Kolhapur, Gadhinglaj-Today
04/12/2023 Page No. 4

तरुण भारत मंगळवार ५ डिसेंबर २०२३



इचलकरंजी : खेळाडूंना शुभेच्छा देताना प्राचार्य डॉ. अनिल पाटील व जिमखाना समिती सदस्य डॉ. आर. एस. रॉड्रिक्स.

# डीकेएएससीच्या खेळाडूंची शिवाजी विद्यापीठ योगासन संघात निवड

प्रतिनिधी
इचलकरंजी

येथील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स, अँड कॉमर्स कॉलेजच्या खेळाडूंची चेन्नई येथे होणाऱ्या साऊथ वेस्ट झोन इंटर युनिव्हर्सिटी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली.

डीकेएएससी महाविद्यालयात झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय योगासन स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करून समीर सनगर, सानिका जाधव, सन्मती सगरे, ऐश्वर्या पाटील या खेळाडूंनी शिवाजी विद्यापीठ संघात स्थान निश्चित केले. या खेळाडूंची अण्णा युनिव्हर्सिटी चेन्नई येथे होणाऱ्या साऊथ वेस्ट झोन इंटर युनिव्हर्सिटी स्पर्धेसाठी निवड झाली.

खेळाडूंना प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांचे प्रोत्साहन लाभले. जिमखाना विभाग प्रमुख प्रा. मुजफ्फर लमीवाले, प्रा. विनायक भोई, प्रा. प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

सकाळ

# ‘डीकेएएससी’मध्ये व्हिजन स्पार्क संशोधन स्पर्धा : ४२ विद्यार्थी सहभागी

# आविष्कार संशोधनसाठी दहा प्रकल्पांची निवड

**सकाळ वृत्तसेवा**

इचलकरंजी, ता. ५ : डीकेएएससी महाविद्यालयात व्हिजन स्पार्क संशोधन स्पर्धा घेतल्या. यात विविध सहा प्रकारांत महाविद्यालयातील विविध विभाग व अधिविभागातील ४२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांच्याहस्ते झाले. स्पर्धेत विज्ञान विभागासह कला व वाणिज्य शाखेतीलही विद्यार्थ्यांची संख्या अधिक होती. विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती वाढल्याचे दर्शन झाले. स्पर्धेतून दहा प्रकल्पांची शिवाजी विद्यापीठात होणाऱ्या आविष्कार संशोधन स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान, मानवशास्त्र भाषा, वाणिज्य व्यवस्थापन, शुद्ध विज्ञान, शेती आणि पशुधन, वाणिज्य आणि व्यवस्थापन कायदा याप्रमाणे प्रमुख विषयासह प्रकार स्पर्धेसाठी होते. यामध्ये संशोधन वृत्तीचा विस्तार करत विद्यार्थ्यांनी पोस्टर्ससह मॉडेलची मांडणी केली. मानवशास्त्र भाषा प्रकारात पट्टणकडोलीच्या बिरदेव यात्रेतील फरांडे बाबांची भाकणूक ते तृतीयपंथी समूहाच्या समस्या आणि उपायोजना, वाणिज्य व व्यवस्थापनमध्ये पैशाचा प्रवास, गूळ उत्पादनातील भेसळ, भरडधान्य चळवळ, वाणिज्य शहर आदी विषय विस्तारतेने मांडले. अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञानात स्मार्ट हेल्मेट असे विषय कल्पकतेने मांडले.

स्पर्धेतील प्रत्येक प्रकारातील पहिल्या दोन विजेत्यांना प्राचार्य डॉ. मणेर यांच्याहस्ते सन्मानित केले. परीक्षण डॉ. अमोल पाटील, डॉ. सी. बी. शहा, डॉ. एस. आर. कामत, सी. ए. शहेनशहा मुजावर, डॉ. डी. आर. कदम आदींनी केले. संशोधन स्पर्धेचे नियोजन डॉ. दीपक कुंभार, डॉ. सागर सुतार, डॉ. अतिश पाटील, डॉ. संदीप गावडे, प्रा. सूरज पठाण, प्रा. मयुरेश पाटील यांनी केले.



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात व्हिजन स्पार्क संशोधन स्पर्धेत विद्यार्थ्यांनी अनेक ज्वलंत विषयांवर पोस्टरसह मॉडेलची मांडणी केली.

## आविष्कार संशोधन स्पर्धेसाठी निवड झालेले विद्यार्थी

- संजीवनी कदम, सौरभ नाकील, रवींद्र खल्ले, अक्षता करड्याळकर, प्रीती भिसे, शिवसागर निषाद, रोहित दळवी, राधिका शर्मा, सनोवर नाईकवाडी, अभिलाषा कोरे, उजन्मा जामदार, कन्ना मुजावर, प्रतीक्षा शिंदे, नीलेश यादव, सानिका पाटील, मानसी पाटील, राजनंदिनी माने, सिमरन डिसोजा, स्वरूप लोले, दीक्षा हजारे, शर्वरी कासुंदे, सुप्रिया मेहता.

## इचलकरंजीच्या वाहतुकीवर पोस्टर

- यंदा संशोधन स्पर्धेत कला शाखेतील विद्यार्थ्यांनी इचलकरंजीच्या वाहतुकीच्या प्रश्नावर मांडणी केली. शहरातील वाहतूक समस्या व उपायोजना या विषयावर वास्तव दर्शन घडवणारे पोस्टर तयार करून उपाययोजनांबाबत प्रकट भाष्य केले. वाहतूक कोंडीसह समस्येवर बोट ठेवत प्रभावी उपाययोजना सुचवल्या. अशा नावीन्यपूर्ण संशोधन प्रकल्पाने वेगळी छाप उमटवली.

सकाळ
कोल्हापूर, गुरुवार, ७ डिसेंबर २०२३

## डीकेएएससी महाविद्यालय

प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांनी प्रतिमेचे पूजन केले. डॉ. मणेर यांनी विचार मांडले. स्वागत व प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी अरुण कटकोळे यांनी केले. उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. विनायक भोई, प्रा. प्रशांत कांबळे आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

इचलकरंजी समाचार गुरुवार दि. ०७-१२-२०२३

# सुदृढ बनण्यासाठी क्रीडा स्पर्धा महत्त्वाच्या - प्राचार्य साळुंखे



इचलकरंजी, दि. ४ – राजर्षी शाहू महाराज आणि शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचा वारसा जोपासत विद्यार्थ्यांनी ज्ञान, विज्ञान, संस्काराबरोबरच एखादा खेळ किंवा कला जोपासायला हवी. तरच मन आणि मनगट सुदृढ बनते. त्यासाठी क्रीडा स्पर्धांचे आयोजन महत्त्वाचे असल्याचे मत स्वामी विवेकानंद संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी व्यक्त केले. येथील एएससी महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठाच्यावतीने आयोजित विभागीय बॉक्सिंग स्पर्धेच्या उद्‌घाटनाप्रसंगी ते बोलत होते.

या उद्‌घाटन कार्यक्रमास प्राचार्य डॉ.एस.एम. मणेर, प्राचार्य डॉ.अनिल पाटील, कन्या महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. त्रिशला कदम, डॉ.डी.सी. कांबळे, प्रा.डी.ए. यादव, प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. विनायक भोई, प्रा. रोहित शिंगे यांच्यासह प्राध्यापक, खेळाडू, विद्यार्थी उपस्थित होते. त्यानंतर पुरुष आणि महिलांच्या विविध गटात स्पर्धा झाल्या. या स्पर्धेतील विजेत्या एकुण ४२ खेळाडूंची इस्लामपूर येथे होणाऱ्या आंतर विभागीय विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाली आहे. यामध्ये पुरुषांच्या ४६ ते ४८ किलो वजनी गटात अजित वालढी, ४८ ते ५१ किलो गटात संदेश काटकर, रेहान शेख, आर्य बुधले, ५१ ते ५४ किलो गटात राज पाटील, सुशांत कारंडे, शिवराज पाटील, ५४ ते ५७ किलो गटात अभिषेक पवार, ५७ ते ६० किलो गटात सौरभ संकपाळ, हिमेश राठोड, सिद्धार्थ गदाणे, ६० ते ६३ किलो गटात आदित्य जाधव, सारंग पाटील, चिन्मय पाटील, . तर महिलांच्या ४५ ते ४८ किलो गटात वैभवी दौलतकर, कृतीका शापुरकर, ऐश्वर्या चंदुरे , ४८ ते ५० किलो गटात सारीका शिंदे, ५० ते ५२ किलो गटात शुभांगी दुडे, ५४ ते ५७ किलो गटात श्रद्धा नलवडे, ऋतुजा देसाई, ५७ ते ६० किलो गटात माहेश्वरी बारटक्के, वैशणवी तेवरद्दी, श्रुती जाधव, ६६ ते ७० किलो गटात सानिका पाटील, भाग्यश्री दोदले, ७५ ते ८१ किलो गटात रुचा पाटील आणि ८१ हून अधिक किलो गटात अश्विनी इंगळे यांची निवड झाली.

तरुण भारत शुक्रवार ८ डिसेंबर २०२३

# डीकेएएससीच्या प्राचार्यपदी डॉ. एस. एम. मणेर

प्रतिनिधी
इचलकरंजी

येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयाचे प्राचार्यपदी डॉ. एस. एम. मणेर हे नुकतेच रूजू झाले. यापूर्वी ते तुळजाभवानी महाविद्यालय, तुळजापूर येथे सहा वर्षे प्राचार्य म्हणून कार्यरत होते. तुळजापूर येथे महाविद्यालयास नॅक मूल्यांकनामध्ये त्यांनी 'ए' ग्रेड मिळवून दिले आहे. तुळजापूर महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीबरोबर भौतिक सुविधा उपलब्ध करून देत आपल्या प्रशासन कौशल्याने महाविद्यालयास नावलौकिक मिळवून दिला.



प्राचार्य डॉ. मणेर यांना प्रशासनातील दीर्घ अनुभव आहे. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या पाचगणी, जत, कडेपूर, तळमावले आणि तुळजापूर अशा विविध शाखेत अध्यापनाचे काम केले आहे. त्यांना शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ या दोन्ही विद्यापीठाची संशोधक मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळाली आहे.

अनेक विद्यार्थ्यांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच. डी. पदवी प्राप्त केली आहे. त्यांनी अनेक ग्रंथांचे संपादनही केले असून त्यांचे अनेक शोधनिबंध प्रकाशित आहेत. लेखक, कवी म्हणून साहित्य विश्वात त्यांची ओळख आहे.

शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांची शिक्षण व विचारांची प्रेरणा घेऊन ते कार्य करत आहेत. डी. के. ए. एस. सी महाविद्यालयाला नॅक मूल्यांकनामध्ये अधिक चांगले मानांकन प्राप्त करून देण्याचा त्यांचा मानस आहे. मूळचे जयसिंगपूरचे सुपूत्र असलेले प्राचार्य डॉ. मणेर यांचे इचलकरंजी येथील विविध मान्यवरांनी स्वागत केले व सदिच्छा दिल्या.

तरुण भारत शुक्रवार ८ डिसेंबर २०२३



तमिळनाडू : येथे साऊथ वेस्ट झोन आंतर विद्यापीठ स्पर्धेत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. एस. एम. मनेर, प्रमुख प्रा. मुजफ्फर लगीवाले, विनायक भोई व प्रशांत कांबळे.

# डीकेएएससीचे साऊथ वेस्ट झोन योगासन स्पर्धेत सुवर्ण

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

तमिळनाडू येथे झालेल्या साऊथ वेस्ट झोन आंतर विद्यापीठ स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या महिला योगासन संघाने सुवर्णपदक तर मुलाच्या संघाने चतुर्थ क्रमांक पटकावले.

या संघात डीकेएएससी कॉलेजच्या खेळाडू सानिका जाधव, सन्मती सगरे व ऐश्वर्या पाटील यांनी उत्कृष्ट कामगिरी करत १२२२.५० इतके गुण मिळवून शिवाजी विद्यापीठ संघाला सुवर्णपदक मिळवून देण्यात सिंहाचा वाटा उचलला आहे. तसेच समीर सरगम याने विद्यापीठ संघाचे प्रतिनिधित्व करत चतुर्थ क्रमांक पटकावले. या सर्व खेळाडूंची भुवनेश्वर (ओडिसा) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ योगासन स्पर्धेसाठी निवड झाली आहे. खेळाडूंना प्राचार्य डॉ. एस. एम. मनेर यांचे प्रोत्साहन लाभले. जिमखाना विभाग प्रमुख प्रा. मुजफ्फर लगीवाले, विनायक भोई व प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.



विद्यार्थ्यांचा सत्कार करताना प्राचार्य एस एम मणेर, मुजफ्फर लगीवले, विनायक भोई,प्रशांत कांबळे व इतर.

# डी. के. ए. एस.सी. च्या खेळाडूंची योगासन स्पर्धेत सुवर्ण कामगिरी

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी** : तमिळनाडू येथे संपन्न झालेल्या साऊथ वेस्ट झोन आंतर विद्यापीठ स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या महिला योगासन संघाने सुवर्णपदक तर मुलाच्या संघाने चतुर्थ क्रमांक पटकावले. या संघात डी.के. ए.एस.सी. कॉलेजच्या खेळाडू कुमारी सानिका जाधव, सन्मती सगरे व ऐश्वर्या पाटील यांनी उत्कृष्ट कामगिरी करत १२२२.५० इतके गुण मिळवून शिवाजी विद्यापीठ संघाला सुवर्णपदक मिळवून देण्यात सिंहाचा वाटा उचलला आहे. तसेच समीर सरगम याने विद्यापीठ संघाचे प्रतिनिधित्व करत चतुर्थ क्रमांक पटकावले. या सर्व खेळाडूंची भुवनेश्वर (ओडिसा) इथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ योगासन स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

सर्व खेळाडूंना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. मनेर यांचे प्रोत्साहन लाभले तर जिमखाना विभाग प्रमुख प्रा. मुजफ्फर लगीवाले, विनायक भोई व प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

सकाळ

# डीकेएएससी महाविद्यालय प्राचार्यपदी डॉ. मणेर

**इचलकरंजी :** येथील डीकेएएससी महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून डॉ. एस. एम. मणेर रुजू झाले आहेत. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांची शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे मिरज महाविद्यालयात बदली झाली. डॉ. मणेर हे तुळजाभवानी महाविद्यालय, तुळजापूर येथे सहा वर्षे प्राचार्य म्हणून कार्यरत होते. तुळजापूर येथे महाविद्यालयास 'नॅक' मूल्यांकनामध्ये त्यांनी 'अ' श्रेणी मिळवून दिली. यापूर्वी त्यांनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या पाचगणी, जत, कडेपूर, तळमावले आणि तुळजापूर अशा विविध शाखेत अध्यापनाचे काम केले आहे. त्यांना शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ या दोन्ही विद्यापीठाची संशोधक मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळाली आहे.



**डॉ. एस. एम. मणेर**

Kolhapur, Gadhinglaj-Today
09/12/2023 Page No. 1

# डीकेएएससीच्या प्राचार्यपदी डॉ. एस. एम. मणेर

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी :** येथील दत्ताजीराव कदम आर्ट्‌र्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून डॉ. एस. एम. मणेर हे नुकतेच रूजू झाले. यापूर्वी ते तुळजाभवानी महाविद्यालय, तुळजापूर येथे सहा वर्षे प्राचार्य म्हणून कार्यरत होते. प्राचार्य डॉ. मणेर यांना प्रशासनातील दीर्घ अनुभव आहे. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या पाचगणी, जत, कडेपूर, तळमावले आणि तुळजापूर अशा विविध शाखेत अध्यापनाचे काम केले आहे. त्यांना शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ या दोन्ही विद्यापीठाची संशोधक मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळाली आहे. अनेक विद्यार्थ्यांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच. डी पदवी प्राप्त केली आहे. मूळचे जयसिंगपूर चे सुपुत्र असलेले प्राचार्य डॉ. मणेर यांचे इचलकरंजी येथील विविध मान्यवरांनी सदिच्छा दिल्या.



डॉ. एस. एम. मणेर

लोकमत
epaper.lokmat.com
कोल्हापूर, सोमवार, दि. ११ डिसेंबर २०२३

# प्राचार्यपदी डॉ. मणेर यांची निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

इचलकरंजी : येथील दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून डॉ. एस. एम. मणेर हे रुजू झाले. यापूर्वी त्यांनी तुळजाभवानी महाविद्यालय, तुळजापूर येथे प्राचार्य म्हणून सहा वर्षे काम केले. तुळजापूर येथे कार्यरत असताना त्यांनी महाविद्यालयास नॅक मूल्यांकनामध्ये



'ए' श्रेणी मिळवून दिली आहे. यापूर्वी त्यांनी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या पाचगणी, जत, कडेपूर, तळमावले, आदी शाखांत काम केले आहे.

सकाळ
मंगळवार, १२ डिसेंबर २०२३



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयाच्या खेळाडूंनी विभागीय आंतरविद्यापीठ योगासन स्पर्धेत सुवर्ण कामगिरी केल्याबद्दल प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला.

## 'डीकेएएससी'च्या खेळाडूंचा सत्कार

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयाच्या खेळाडूंनी विभागीय आंतरविद्यापीठ योगासन स्पर्धेत सुवर्ण कामगिरी केली. तामिळनाडू येथे झालेल्या स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या महिला योगासन संघाने सुवर्णपदक, तर मुलांच्या संघाने चतुर्थ क्रमांक पटकावला. मुलींच्या संघात सानिका जाधव, सन्मती सगरे, ऐश्वर्या पाटील यांनी उत्कृष्ट कामगिरी करत विद्यापीठाला विजेतेपद मिळवून देण्यात सिंहाचा वाटा उचलला. समीर सरगम याने विद्यापीठ संघाचे प्रतिनिधित्व करत संघाला चतुर्थ क्रमांक मिळवून दिला. खेळाडूंची ओडिसा येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ योगासन स्पर्धेसाठी निवड झाली आहे. खेळाडूंचा प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांनी सत्कार केला. प्रा. मुझफ्फर लगीवाले, प्रा. विनायक भोई, प्रा. प्रशांत कांबळे यांनी मार्गदर्शन केले.

तरुण भारत गुरुवार १४ डिसेंबर २०२३



इचलकरंजी : पद्मरत्न दिवाळी अंकावर चर्चा करताना प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर.

# डीकेएएससीमध्ये 'पद्मरत्न' दिवाळी अंकावर चर्चा

**इचलकरंजी :** येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालय येथे 'पद्मरत्न २०२३' या दिवाळी अंकावर चर्चा आयोजित केली होती. महाविद्यालयातील वाङ्मय मंडळ, मराठी विभाग आणि वाचनप्रेमी मंच यांच्यावतीने आयोजित चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर होते. प्राचार्य डॉ. मणेर म्हणाले, वाचनाने माणूस समृद्ध होतो, पुस्तके माणसाला नव संजीवनी देतात, आजच्या बदलत्या समाज माध्यमांच्या आभासी दुनियेत नितळ आनंदासाठी पुस्तकांचे अलौकिक जग सतत माणसाला खुणावत असते. आपले साहित्य सत्यमेव जयते वर आधारित असल्याने सत्यम शिवम सुंदराचा अविष्कार म्हणजे आपले साहित्य आहे. जात, धर्म, पंथ, देश यांच्या सीमा ओलांडून साहित्य हे विश्व कल्याणाची कामना करत असते. पद्मरत्न सारखे दिवाळी अंक याच भावनेचा भाग आहेत. यावेळी अंकाच्या चर्चेत डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, प्रकाशक दादासाहेब जगदाळे यांचा विशेष सहभाग होता. प्रास्ताविक प्रा. संजय सुतार यांनी केले. या दिवाळी कवी प्रा. रोहित शिंगे व प्रियांका भाटले यांनी या आपल्या कविता सादर केल्या. समारंभास वाङ्मय मंडळाच्या डॉ. सुनीता वेल्हाळ, डॉ. अंजली उबाळे, प्रा. भारती कोळेकर, प्राध्यापक व पुस्तक प्रेमी मंचचे विद्यार्थी उपस्थित होते. आभार समृद्धी निकम हिने मानले, सूत्रसंचालन संजीवनी कदम हिने केले.

सकाळ
शुक्रवार, १५ डिसेंबर २०२३

# इचलकरंजीत राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन

## डॉ. प्रतिभा पैलवान : ‘डीकेएएससी’मध्ये भारतीय भाषा दिवस

**▸ सकाळ वृत्तसेवा**

इचलकरंजी, ता. १४ : ‘इचलकरंजी शहरात राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडते. विविध राज्यांतील लोक उद्योग-व्यवसायासाठी येथेच राहतात. अशांनी मराठी आपलीशी केली आहे. डीकेएएससी महाविद्यालयात या बहुभाषकांची मुले-मुली शिक्षण घेतात. या मुलांनी सादर केलेले भाषिक आविष्कार भारतीय भाषा दिवस सार्थ ठरवणारे आहेत,’ असे गौरवोद्गार डॉ. प्रतिभा पैलवान यांनी काढले.

येथील डीकेएएससी महाविद्यालयात महान साहित्यिक चित्रास्वामी सुब्रमण्यम् भारती यांची जयंती अर्थात भारतीय भाषा दिवस उत्साहात झाला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर होते. विद्यार्थ्यांनी संस्कृत, मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती, भोजपुरी, मारवाडी, कानडी, मालवणी, कोकणी, वऱ्हाडी, बंगाली आदी भाषा व बोली भाषांमधील अभिवाचन, कथा, कविता, एकपात्री, नाटिका, प्रहसन, गाणी अशा विविध प्रकारांमध्ये सादर केले.



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात भारतीय भाषा दिवस समारंभात डॉ. प्रतिभा पैलवान यांनी मार्गदर्शन केले.

अध्यक्षस्थानावरून बोलताना प्राचार्य डॉ. मणेर म्हणाले, ‘भाषा माणसांना जोडण्याचे कार्य करते. आपले-परके असे भाषेत काही नसते. मानवी संवादाचे माध्यम असणाऱ्या भाषेमधून आपण व्यक्त झाले पाहिजे.’ डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, डॉ. सुनीता वेल्हाळ, अंजली उबाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. स्वागत समृद्धी निकम यांनी केले. प्रास्ताविक सरगम पोवार यांनी केले. पाहुण्यांचा परिचय योगिता सोनटक्के यांनी करून दिला. सूत्रसंचालन संजीवनी कदम, प्रीती भिसे यांनी केले. आभार प्रेम मदीहाळी यांनी मानले.

दक्षिण महाराष्ट्र
केसरी
१५ डिसेंबर २०२३/८

# डीकेएएससी मध्ये भारतीय भाषा दिवस संपन्न

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी** : येथील दत्ताजीराव कदम आर्ट्‌स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयात महान साहित्यिक चिन्नास्वामी सुब्रमण्यम् भारती यांची जयंती अर्थात भारतीय भाषा दिवस हा समारंभ उत्साहात पार पडला.

प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या समारंभासाठी डॉ. प्रतिभा पैलवान या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. यावेळी महाविद्यालयाच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी विविध भारतीय भाषांमध्ये आपला आविष्कार सादर केला. त्यामध्ये संस्कृत, मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती, भोजपुरी, मारवाडी, कानडी, मालवणी, कोकणी, वऱ्हाडी, बंगाली इत्यादी भाषा व बोलीभाषांमधील अभिवाचन, कथा, कविता, एकपात्री, नाटिका, प्रहसन, गाणी अशा विविध प्रकारांमध्ये सादरीकरण केलेल्या कलाविष्कारांना उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली.

यावेळी डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, डॉ. सुनिता वेल्हाळ, अंजली उबाळे यांची विशेष उपस्थिती होती. स्वागत समृद्धी निकम, प्रास्ताविक सरगम पोवार, पाहुण्यांचा परिचय योगिता सोनटक्के तर आभार प्रेम मदीहाळी या विद्यार्थ्यांनी केले. कार्यक्रमाचे संयोजन वाङ्मय मंडळ प्रमुख प्रा. संजय सुतार, प्रा. भारती कोळेकर व प्रा. रोहित शिंगे यांनी केले. सूत्रसंचालन संजीवनी कदम व प्रीती भिसे यांनी केले.

* **पिंपरी** : उत्तर प्रदेश येथून येऊन पिंपरी-चिंचवड व पुणे शहरात रेकी करून चोऱ्या करणाऱ्या एका टोळीला चिखली पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून २४ लाख ४५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.